काव्य/संदर्भ
२१०८



# गोलपिठा

नामदेव लक्ष्मण ढसाळ

# गोलपिठा

मूल्य चार रुपये पहिली आवृत्ती जून १९७२

प्रकाशक अनिरुद्ध पुनर्वसु
१ झपुर्झा साहित्य सहवास
वांद्रा पूर्व मुंबई ५१

© नामदेव लक्ष्मण ढसाळ

वितरण व अन्य व्यवस्था
आराधना प्रकाशन मुंबई

मुद्रक चिंतामण वामन जोशी
माधव प्रिंटिंग प्रेस अलिबाग

मुखपृष्ठ रेखाटने नामदेव लक्ष्मण ढसाळ

मांडणी अरुण घाटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

सर्वसामान्य माणसाला सत्तासंपत्तिप्रतिष्ठा यांपासून
वंचित ठेवणाऱ्या शोषणव्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या
तमाम छोट्यामोठ्या चळवळींना व प्रवृत्तींना

।। नामदेव ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

नामदेव। माझा एक मित्र। त्याचा हा कवितासंग्रह। हा प्रसिद्ध करायला मी पुढे झालो। केवळ एका मित्राला हात द्यायचा म्हणून। बाकी यात माझे काही नाही। आहे ते सर्व नामदेवचेच। त्याचे हे काव्य मराठी वाचकांपुढे यावे अशी माझी इच्छा होती। ती आज पुरी होत आहे।

अनिरुद्ध पुनर्वसू



# गोलपिठा व ढसाळ यांविषयी

## विजय तेंडुलकर

ग्रं. क्र. २८५८ ... शाखा (स्थळ प्र

नामदेव ढसाळ त्याच्या कवितासंग्रहाची बातमी सांगत आला तेव्हा मला आनंद वाटला. कवितांचा मी व्यासंगी वाचक नाही. परंतु कविता समोर आली तर घाईने उलटतही नाही. ढसाळच्या कविता मी फुटकळ स्वरूपात वाचलेल्या होत्या. त्या मला वेधक वाटल्या होत्या. काही वेळा पूर्णपणे कळल्या नव्हत्या, तरीही त्यामागचे मन जाणवले होते. नंतर ढसाळ एकदा भेटला. औपचारिक ओळख झाली. ढसाळ याच्या जगाविषयी त्याच्या कवितांमुळे माझ्या मनात किती औत्सुक्य साठले आहे, हे तेव्हा कळले. इतके प्रश्न एकदम मनात जमले की काही विचारणेच जमले नाही. ढसाळ थोडासा हसला, मी हसलो. ढसाळचे हसणे मला जवळिकीचे वाटले नाही. असेही वाटले की ते जवळिकीचे का असावे ? त्याच्या मनात माझ्या जगाविषयी एक आकसच असला पाहिजे. त्याच्या लेखी मी त्या जगाचा प्रतिनिधीच नव्हतो काय ?

नंतर काही वेळा तो दिसत असे, पण हा माणूस आपल्याशी नीट बोलणार नाही असे माझ्या मनाने घेतले होते. ढसाळची कविताच त्याच्यापेक्षा मला जवळची होती. तिच्यातले अनेक शब्द, प्रतिमा न कळूनही ती मला अस्सल, कसदार आणि अस्वस्थ करणारी वाटत होती. या कवितेशीच माझी प्रसंगा-प्रसंगाने एका मर्यादेपर्यंत दोस्ती जमलेली होती. आणि ढसाळ एकदा माझ्याशी आपण होऊन बोलला. फार नव्हे पण मोकळा बोलला. मला खूप बरे वाटले.

या आश्चर्याला नंतर फार वाव उरलाच नाही. ढसाळ माझ्याकडे येऊ लागला, बसू लागला, हसू-बोलू लागला. इतके खोलवर वेदनेने नि रागाने भरलेले काव्य लिहिणारा हा तरुण इतका प्रसन्न हसतो कसा, याचे मी नवल करी. असाच तो आला आणि हसत म्हणाला, माझ्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहा. त्याने फार प्रयत्न न करताच मी होकार दिला. आता आठवते की माझ्याहून अधिकारी माणसांकडे जाण्याला मी त्याला आग्रहाने सांगितले पण त्याने ते विशेष मनावर घेतले नाही. त्याने माझी परीक्षा पाहाण्याचे ठरवलेच होते. तो म्हणाला, तुम्हीच लिहा. मी आता कोणाकडे जात नाही.

कवितासंग्रहाला मी प्रस्तावना कशी लिहिणार ? त्यातही जी कविता

(2)

मला आवडली आहे पण शब्दशः समजत नाही, तिच्याविषयी कोणत्या अधिकाराने मी लिहिणार ? केवळ एकादी गोष्ट आपल्याला समजते तशी आणि तेवढी आवडते हा काही तिच्यावरील आपला अधिकार ठरत नाही. जसजसा विचार करू लागलो तसतसा माझा मुळातच कमी असलेला आत्मविश्वास आणखी कमी होऊ लागला. मी प्रथम ढसाळचे शब्दभांडार जमेल तेवढे माहिती करून घेण्याचे ठरवले. त्याने स्वाधीन केलेल्या कविता एकत्रितपणे वाचल्या, न कळणारे शब्द आणि प्रतिमा बाजूला काढून ढसाळ-पुढे विद्यार्थ्यासारखा बसलो. (ढसाळ मला 'सर' म्हणतो.) ढसाळने मला समजावून सांगितले. एरवी माझ्याशी (वरपांगी तरी) थोडा आदराने बोलणारा ढसाळ या वेळी एका निर्णायक आणि शांत अधिकाराने बोलत होता. कारण ते जग त्याचे होते. त्या जगाची रेषा न् रेषा त्याने जगून टिपलेली होती आणि एवढ्यापुरता त्याचा अधिकार होताच. अज्ञान मी होतो. चंद्रबिंदी म्हणजे काय, डोबडी म्हणजे काय, सादळलेली झाडे म्हणजे काय, रांडकी पुनव कशी आणि कुठे असते, खैरबांडे पांजरपोळ डग्गा याचा अर्थ काय, धेडघाय पोटले कशाला म्हणावे, न.. नष्टचर्य असे एका कवितेत किंवा उज्-एड असे दुसऱ्या एका कवितेत आवर्जून त्याने का लिहिले आहे, पाणचट गवशी कुठे असते, छप्पन्न टिकली बहुचकपणा नक्की कसा, मगरमच पलित्यांचा अर्थ काय, कु० अनुराधा बुधाजी उपशाम कोण आणि कोठली, थम घेऊन म्हणजे काय करून, महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या यात सांडणे शब्द कशाकरता, रायरंदी हाडुक कसे असते, खोडाबेडा हात म्हणजे कसे हात, बिंदाचिंदा हा कोठला शब्द, नेपाळी पोरी डावे-उजवे कसे करतात, कंट्रीच्या मसाल्याची मलभोर मलय हे काय प्रकरण, पिढ म्हणजे शरीराचा कोठला भाग, डिगडांग धतिंगचा शब्दार्थ काय, गुपची शिगा, डेडाळे, डल्ली, सल्ली, बोटी, गुडसे, डीलबोळ ही कोठली भाषा, अनबन कसे बनवतात—एक ना शंभर गोष्टी. ढसाळने मला सारे सहनशीलपणे आणि अधिकाराने समजावले. समजावताना एकीकडे तो संकोचत होता. (विशेषतः घाणवाचक वा लिंगवाचक शब्द समजावताना) तरी माझा वर्ग घेण्यातला आनंदही त्याला मनोमन मिळत होताच आणि तो त्याच्या पारदर्शक चेहऱ्यावर दिसत होता.

परंतु अर्थ विचारताना आणखीच घोटाळा होऊ लागला. ढसाळच्या जगा-

विषयीच्या माझ्या घोर अज्ञानाने मला आता पुरते घेरले. कित्येक गोष्टींचे आपणाला ज्ञान नसते. नव्हे, अज्ञानच असते. परंतु जोवर त्या गोष्टीविषयी जाहीररित्या व ते देखील लेखी काही म्हणण्याचा सवाल येत नाही तोवर अज्ञानासकट आपण सुखात असतो. ढसाळने मला हसत हसत खिंडीत गाठले होते. माझ्या अज्ञानाची मला (क्वचितच वाटू शकणारी) शरम वाटली. इतक्या जवळ जगणाऱ्या या जगाविषयी आपण असे मख्ख असावे हे जाणवले आणि बोचू लागले. मी ढसाळला म्हणालो, मला तुझे जग पाहायचे आहे. हसत त्याने ते दाखवण्याची तयारी दाखवली. ढसाळचे घर, त्याचा मोहल्ला, त्यातली माणसे आणि त्यांचे जगणे बघत ढसाळबरोबर मी एका रात्री चांगला दोन की तीन वाजेपर्यंत भटकलो. त्या रात्री गारठा मनस्वी होता. अनेकांना ढसाळने मला भेटवले. अंधारात आणि भगभगीत प्रकाशात, दुर्गंधीत आणि स्वस्त अत्तरांच्या दर्पात, भकास शांततेत आणि कर्कश गोंगा-टात ढसाळने मला त्या गारठून टाकणाऱ्या रात्री भेटवलेल्या माणसांचे चेहरे, त्यांच्या नजरा, त्यांचे शब्द माझ्या अद्याप चांगले लक्षात आहेत.

परंतु इतकेच. एका रात्रीत मी हे चेहरे आणि हे शब्द यामागचे आणि पलीकडचे काय पाहू शकणार ? फार फार वर वर मी थोडेबहुत पाहिले. ढसाळ आणि त्याचा एक जोडीदार मला आणखी माहिती पुरवत होते. ती ऐकली. या सगळयाचा ढसाळची कविता अधिक चांगली समजावून घेण्या-साठी उपयोग करण्याची माझी धडपड होती. ढसाळची कविता आजही मला पुरती समजली आहे असे मला वाटत नाही. पण ती मला जरा जास्त समजू लागली आहे आणि त्याहूनही जास्त आवडू लागली आहे. ढसाळच्या जगात उभे राहून त्याच्या कवितेत डोकावण्याचा प्रयत्न टाकून, मी आता ढसाळच्या कवितेच्या पुलावरून त्याचे जग समजावून घेऊ लागलो आहे. ह्या जगाच्या प्रत्यक्ष आणि ढसाळनेच घडवलेल्या ओझरत्या दर्शनाने या कामी मला मदत झाली आहे.

पांढरपेशा जगाच्या सीमा संपून पांढरपेशा हिशेबांनी ‘ नो मॅन्स लँड ’ –निर्मनुष्य प्रदेश–जेथून सुरू होतो तेथून नामदेव ढसाळ याच्या कवितेचे मुंबईतील, ‘ गोलपिठा ’ नावाने ओळखले जाणारे जग सुरू होते. हे जग आहे रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या पोटांचे, मरणाच्या खस्तांचे, उद्याच्या चिंतांचे, शरम आणि संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्यदेहांचे, असोशी

वाहणाऱ्या गटारांचे, गटाराशेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसेकापूंचे बैराग्यांचे, दादांचे आणि भडव्यांचे; दर्ग्यांचे आणि क्रूसांचे; कुरकुरणाऱ्या पलंगालगतच्या पोपडे गेलेल्या भिंतीवरच्या देवांचे आणि राजेश खन्नांचे; गांजाच्या खाटल्याचे, त्याच खाटल्यावरल्या कोपऱ्यात झोपलेल्या गोजिरवाण्या मुलाचे. त्या मुलाला 'शरीफ' बनवण्याची महत्वाकांक्षा बाळगीत जवळच्या कुंटणखान्याची रखवाली करणाऱ्या क्षयरोगी बापाचे,हिजडयांचे, हातभट्ट्यांचे, आध्यात्मिक कवाल्यांच्या तबकडयांचे आणि कोणत्याही क्षणी पाण्याच्या भावाने वहाणाऱ्या ऊन चिकट रक्ताचे, वाफा ओकणाऱ्या पाणचट लालभडक चहाचे; स्मगलिंगचे, नागव्या चाकूंचे, अफूचे. १९४३ साली मुंबईच्या गोदी भागात एक नंगा बाबा ओरडू लागला, माझ्यामागून या, जगबूड येणार, माझ्या-मागून या. लंगडे, थोटे, भुकेकंगाल, बेकार, रोगी, भोगी जे कोणी त्याच्यामागून जिवासाठी धावले ते या भागात येऊन वाचले म्हणे. कारण गोदीत प्रचंड स्फोट झाला. नंगा बाबाने गोलपिठ्याला आणून सर्वांना वाचवले. ढसाळच्या गोलपिठ्याला. जेथे महारोगी शरीरेही किंमत देऊन रस्त्याकडेस भोगली जातात, संभोगाशेजारी अर्भके रडतात. वेश्या गिऱ्हाइकांच्या प्रतीक्षेत गळाभर प्रेमगीतें गातात, जेथून कोणी जिवानिशी पळू शकत नाही, पळाले तर परत येते, तो गोलपिठा. दया-क्षमा-शांती यांचा लागता नसलेला गोलपिठा. ढसाळ सांगतो, इथला प्रत्येक हंगाम बेदर्दीच–उफराटचा काळजाचा–असतो. '

' हे ढसाळच्या भोवतालचे आणि त्याला कायम वेढून राहिलेले जग. या जगात आला दिवस सापडेल तसा भोगून फेकणाऱ्या कवी नामदेव ढसाळचे रक्त महाराचे आहे. अस्पृश्यतेचा धर्मदत्त शाप ओठ बांधून एकाद्या पवित्र जखमेसारखा जपत आपल्या अस्पृश्य सावल्यांसकट जगले ते ढसाळचे पूर्वज होते. नामदेव ढसाळ– या पूर्वजांचा वंशज– कदाचित् तसाच जगला असता; परंतु एक महार वेगळा निघाला. त्याने त्याच्या समाजाचे भवितव्य बदलून टाकण्याचा चंग बांधला. त्या हीनदीन समाजाला क्रोध दिला. माणूसपणाचे हे महत्त्वाचे चिन्ह त्याने नामदेव ढसाळ याच्या पिढीच्या कपाळाकपाळावर डागले. अस्पृश्य नवबौद्ध बनले, घटनेने दास्यमुक्त झाले. परंतु खेडोपाडी त्यांचे नशीव पालटलेच नाही. आंबेडकर गेले. छळ, जुलूम, पिळवणूक, विटं-बना संपली नाही. कनिष्ठ वागवणूक मिळतच राहिली. शतकाशतकांची

जखम भळभळतच राहिली. नामदेव ढसाळ याच्या कवितेचे या जखमेशी अतूट आणि फार आतले नाते वाटते. अदम्य विषाद आणि क्रोध या कवितेच्या शब्दाशब्दावाटे जाळासारखा फुटत रहातो. पोरगेल्या वयातली ही हळवी आणि नाजूक होऊ बघणारी कविता जागोजाग आतल्या दाहाने करपलेली भासते. भोवतालच्या आयुष्यातले उबगवाणे आणि किळसवाणे तपशील ती अलंकारांसारखे, एका मुजोरपणे, मिरवताना दिसते. या तपशिलांनी नटते, मुरडते आणि भेसूर होते. हागमूत, झवणं, लवडा, लेडाची गाडगी, जंतांच्या माळा यांचे नामदेव ढसाळ याच्या कवितेतले उल्लेख उपरे राहात नाहीत. त्याच्या सर्व कवितांतून वाहणाऱ्या खोलवरच्या संतप्ततेचे ते काव्यात्म उद्रेक बनतात आणि म्हणून कविताच वाटतात. अनेक अपरिचित बोली-शब्द या कवितांतून सहजपणे येतात. परिचित शब्दांचे अनोखे उपयोग होताना दिसतात. या साऱ्यात विलक्षण आत्मविश्वास जाणवतो. पांढरपेशा थराने दिमाखाने जपलेली अलवार घरंदाज भाषा नामदेव ढसाळ एकाद्या बटकीसारखी वाकवतो, निर्दयपणे तिची मोडतोड करतो अथवा तिच्यात अशिष्ट भर घालून तिचे बुद्धयाच एक विद्रूप करतो. त्याच्या कवितेतल्या आशयासाठी हे सारे त्याला आवश्यक वाटते. हे करताना भाषेचे पारंपारिक सामर्थ्य आणि सौंदर्य त्याला उमजले आहे याचेही पुरावे तो मधूनच देतो. या अशा गंगाजमनी, विद्रूप, मोडक्यातोडक्या परंतु अतिशय ओघवत्या आणि मनस्वी भाषेत नामदेव ढसाळ याचे जगणे एका अनावरपणे आणि सहजपणे काव्यरूप घेते. या जगण्यातला असह्य दाह कवितारूप होतो. या जगण्यातल्या अदम्य संतापाचा उकळता लाव्हा सुस्थित, संभावित जगावर चौफेर भिरकावीत नामदेव ढसाळ याची कविता जेव्हा 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांना' हाकारीत 'अंधारयात्रिक' होण्याचे नाकारीत, 'शहराशहराला आग लावण्या'चे पुकारे देत सुसाट निघते तेव्हा आजच्या मराठी कवितेत क्वचित आढळणाऱ्या खऱ्याखुऱ्या बंडखोरीच्या झळाळत्या प्रत्ययाने मी दिपून जातो. या प्रकारचे जे कवी ढसाळ याने लिहिले आहे, ते चुकूनही प्रचारकी झालेले नाही हे विशेष. ही बंडखोरी आत्म्याची आहे; कंठाळी नाही. या बंडखोरीला— कवितेपुरते तरी— राजकीय रंग नाहीत, ती अधिक मूलभूत स्वरूपाची आणि म्हणून अस्सल आहे. 'स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे', 'पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद भगोष्ट', असे म्हणण्याचा छातीठोक निर्भयपणा तिच्यात आहे.

'गोलपिठ्या 'च्या गल्लीबोळांतून मशाली पेटवून हिंडणाऱ्या 'महाग्यानी' लोकांना उद्देशून, ज्यांना आपल्या गांडीखालचाच अंधार कळत नाही त्यांनी पेटलेल्या माणसांना छप्पनटिकली बहुचकपणा अजूनही दाखवावा?' असे ती न कचरता म्हणू शकते. 'व्यासपीठावरून समग्र बलात्कार घडवून आणावेत, साहित्यसंघ, शाळा, कॉलेजे, हॉस्पिटले, विमानअड्डे यावर हातबाँब, हैड्रोजनबाँब टाकावेत' असे घोषित करण्याइतकी ती निर्णायक आहे. तडजोडीचे सर्व पूल तिने केव्हाच उडवले आहेत आणि प्रस्थापिततेच्या सर्वनाशाचा विडा तिने उचलला आहे. कवी ढसाळ याच्या कवितेला निकाली झुंजीचा जसा काही ध्यास लागून राहिला आहे. या ध्यासातली तिच्यात व्यक्त होणारी क्षणिक उदासीनता देखील मरगळलेली नाही; तो बलदंड प्रज्ञेचा क्षणिक शीण भासतो. तो पराभव नव्हे; ती युद्धतहकुबी असते. या कायम युद्धमान कवितेतला शृंगार, तिच्यातला वियोग, तिच्यातील तात्कलिक वैफल्य, तिच्यातील तसलेच वैराग्य किंवा तिच्यातले गाऱ्हाणे, या साऱ्याला बंडखोर गरम रक्ताचा जो स्पर्श आहे तो मला तरी फार लोभसवाणा वाटतो. समाजातील दडपल्या थरातून आलेला ढसाळ हा काही पहिलाच कवी नव्हे. तो या थरातला पहिलाच गुणी कवी देखील नाही. परंतु मराठी कवितेच्या परंपरेचा काही वारसा घेऊनही तिच्यातले अर्वाचीन पांढरपेशे मन आपल्या कवितेत सरकू न देणारा, आपल्या कवितेचा पिंड अंतर्बाह्य आपल्या जगाशी पक्का बांधला ठेवलेला आणि या प्रयत्नात कोठेही खोटा, प्रचारकी वा कंठाळी न होणारा ढसाळ हा विरळा दलित कवी मात्र नक्कीच आहे. अद्याप तरी त्याला हे जमले आहे. त्याच्या कवितेने अनेकदा तुकारामाच्या अस्सल अभंगांची आठवण मला दिली असे मी म्हटले तर त्यात मी ढसाळची औपचारिक स्तुती करतो असे कोणी मानू नये. तुकारामाचा आध्यात्मिक नव्हे परंतु काव्यरचनेचा वारसा तिच्यातील उत्स्फूर्त, रांगड्या, रोकड्या संतप्ततेसकट ढसाळची कविता वागवताना मला भासते.

कवी ढसाळचा भविष्यकाळ कसा असेल ते मला माहीत नाही. त्याच्या सामाजिक थरातून मोठा दिलासा देत पुढे आलेले लेखक-कवी पहाता पहाता चुकीच्या अर्थाने पांढरपेशा, शब्दाळ किंवा रोमँटिक झालेले मी पाहिले आहेत. त्यांच्या निर्मितीने आत्माच गमावला आणि ती निष्प्रभ बनली, जुन्या कीर्तीवर मिरवत राहिली. ढसाळ याचे असे न होवो.

## त्यांची सनातन दया।

त्यांची सनातन दया फॉकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही
खरंच त्यांनी आपल्यासाठी आभाळात मांडव घातला नाही
बोलून चालून ते सामंतशहा त्यांनी तिजोरीत लॉक केलेला प्रकाश
लादलेल्या पडीबाज आयुष्यात फुटपाथदेखील आपली नाही
माणूसपणाची किळस यावी इतके त्यांनी बनविले आहे लाचार
करपून गेलेल्या आतडचात साधी माती भरायला मिळत नाही
उगवणारा न्यायी दिवस लाच खाल्ल्यागत त्यांचाच होतो पाठीराखा
आपली कत्तल घडताना त्याच्या सढळ हातातून निःश्वासही ढळत नाही

# । माण्सं भादरून

।। माण्सं भादरून पेपरवेटमधी कुणी बंद केलीयत ।।
माझ्या चेहऱ्यामोहऱ्यातनं गळणारं धो धो गूपाणी
खच्ची करणारा कापुरुष या सुगीत जरूर उगवेल
फक्त बरबटलेल्या हातांनी
तुम्हाला पांढऱ्या कागदावर ठसे द्यावे लागतील
माझ्या मुसक्या तोडाव्या लागतील
तुमच्या आणि माझ्या जून दुष्मनीवर
मी माती पसरू शकतो.
पण या कोऱ्याकरकरीत डोब्डींना
भ्रष्ट गायरानात ढकलणं थांबवा :
समजा त्या चकल्या आणि रुळल्या तर
तो तुमच्या न् माझ्या दु:खाचा सर्वात मोठा दिवस असेल.
माझा दरोबस्त अवयव
सडलेला वाटतोय ना तर मंजूर
तुम्ही तो अवश्य आर्ट गॅलऱ्यांत ठेवा
वाटल्यास माझी आतडी काढून
संगिनीला लटकवा
आदिमसूर्याला रडताना पाहिन मी
शेवटचा कोसळताना पोटभरून
।। माण्सं भादरून पेपरवेटमधी कुणी बंद केलीयत ।।

## एखाद्याने एखाद्याला ।

एखादयाने एखादयाला सांडपाण्यावर जगवणे म्हणजे
दोघांनीही दोघांना अनबन बनवणे
वडाची साल पिंपळाला लावली नि पिंपळाची साल
वडाला लावली हे एक वेळ माणूस समजू शकतो
पण नीलेतून रोहिणीतून वाहतुकत राहाणारे रक्तपक्षी
तद्वत डबल फास्ट ट्रेन यांचा सर्वसाधारण अर्थ
काढता येत नाही आपला म्हणून
असा कुठे सर्जन असेल का की जो पोपडे धरलेल्या
शरीराचे कलात्मक समीक्षण करतो
एकावर एक ११ एकावर दोन १२ चढेपर्यंत
अरबी समुद्र आटून जातो
विझवतीचा एकुलता एक खांब
निपुत्रिक होतो
समोर हडळींचा ताका साम्राज्यासारखा तुंबळ
झाडाला झटं घेतो

## । उघडझाप चालूहे

उघडझाप चालूहे
झाडे सादळलेली
लूत पसरलेली दवदारी चौखूर
कुत्रं हुंगतंय भिंत : भिंत डचडचतेय ओलीचिक
या आर्द्रतेत तुम्हांवर फुल्ली मारणं
आत्यंतिक सोयिस्कर
परंतु तुमचे स्थितिस्थापक इतिहास बदलता येत नाहीत
मला माझ्या भल्याबुऱ्यासह
इथल्या कुंडात पडलेली सूर्यचंद्राची प्रतिबिंबं
अस्खलित व्यभिचारी निघालीयत
या बेदिल हिवलाटेत
तुमच्या गुदमरत्या छात्या मी करतोय स्क्रिनिंग
भाडोत्री रिलेशन्सपेक्षा मी पहातोय
तुम्हाला निकटवर्ती आणि आसपास
तुमचं उतवणी गंगेच्या पाण्याहून पवित्र
बीनखोलीचा माणूस फिरवला जावा शहरभर तसा मी
तुमच्या उंचावत जाणाऱ्या हाडीव्रणावर सपटलोशन
तुम्ही माझ्या आया व्हा
तुमच्या फदफदत्या कुशीत मला निवारा द्या
मी माझे ३।। इंची प्रसरण पसरतोय तुमच्यात बेमतलब
सेन्सस करतोय तुमच्या यारांना बाप म्हणून
तुमचे छपरी भडवे माझे खापरपंजोबा
आणि तुमचे लवंडे– काका, मामा, चुलते वगैरे
या जडजंबाल अंधारात तुम्ही पेरून ठेवलीय क्रांतीची ऋचा

तुम्ही ध्वनी सुधारकांचा पहिला आणि शेवटचा
मी नमतोय फक्त तुमच्यापुढे प्रारंभ आणि अस्त
टंकन करतोय तुमचे संभोगशिल्प
मी तुमच्याचपुढे स्वच्छ निरागस
अंगावरली मखमल ढाळून
माझ्या क्रिएटिव्ह अंगरख्यांनो
तुमचे अश्रू जुलमी रुस्तमाना करतोय नमूद मी
कारण मंदिर मस्जिद चर्च तुम्ही एकाच दोऱ्यात ओवलीयत
तुम्हाला गिळत सुटलेलं बदफैली संस्कृतिकरण
लांडभुंडं पहातोय चिरफाळलेल्या डोळ्यांनी
खद्र्या मैनांनो
तुमच्या उध्वस्त पुच्यांचा मी निःपक्ष भाष्यकार
समस्त वारकऱ्यांचा कर्दनकाळ
मी सावरतोय तुमच्या वरंगळलेल्या रक्तबंबाळ धुरा
तुमच्या गांडीचे कानवले कुरतडलेत ज्यांनी
त्यांच्या नाशासाठी मी पिकू घातलीय आढी
तुम्ही छिन्नभिन्न पंखांनी पिसारत या
माझा देहोदय मी मांडलाय रस्त्यात
आणि भिरभिरताहेत माझ्या काळजात
कुणीतरी हागून ठेवलेली ओयासिसं
उघडझाप चालूहे
झाडे सादळताहेत
लूत पसरते चौखूर दवदारी

## । अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात
किती दिवस राहायचं आम्ही ?
श्वास घुसमटत !
...न...नष्टचर्येच्या गटारात
सडत होतो आम्ही अगतिक किड्यासारखे
आजपर्यंत...
लक्तरांत गुंडाळलेली आमुची अब्रू
गोलपिठ्यावर नागविणारांनो–
–तुमचा ऱ्हास जवळ आलाय :
मुक्तछंदाच्या संजीवनीने
आम्ही जिवंत झालो आहोत–
–तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी !
–शब्द म्हणाले
अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

# आमच्या आळीतून जाताना... ।

नामदेव ढसाळ.

हे महाग्यानी लोक
हिंडताहेत मशाली पेटवून
गल्लीबोळांतून, आळीआळींतून
जेथे उंदीर उपाशी मरतात–
त्या आमच्या खोपटांतील
काळोख, म्हणे, यांना कळतो
पाणचट गवशीसारखे हेही एक थेर !
ज्यांना आपल्या गांडीखाललाच अंधार कळत नाही
त्यांनी पेटलेल्या माण्सांना
छप्पन्न-टिकली बहुचकपणा
अजूनही दाखवावा !
अरे धूर्तांनो,
ज्यांना तुमची नसन्नस कळलीय
त्यांच्याशी तरी इमान राखा
आणि ज्यांना उजेड दिसत नसेल
त्यांना तुमच्या मशाली खुशाल दाखवा;
आमची ना नाही
मात्र एक :
आमच्या आळीतून जाताना
त्या विझवूनच पुढे जा
आज आम्हाला, या खोपटा-खोपटांतून
पूर्ण सूर्य दिसतोय !

## । घर सोडताना

घर सोडताना दरवाजे जिथल्या तिथे ठेवावेत
        तुझ्या पांढऱ्या फटफटीत कपाळावर
        आम्ही मळवट भरून अवतरलोत
तू आम्चा हो म्हण । तू आम्चा हो म्हण
तू बोलत का नाहीस । तू बोलत का नाहीस
ही पहा आम्ही कोरीकरकरीत पाटी आणलीय
        उत्तरं दे : दे उत्तरं : दे म्हंतोना
        वेश्या वाढतात        प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह
        झोपड्या वाढतात      प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह
        भूकबळी वाढतात      प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह
        भिकारी वाढतात       प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह
        बेकार वाढतात         प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह प्रश्नचिन्ह
का वाढतात वाढतात प्रश्न : प्रश्न : वाळवंट वाळवंट का का वाढतात
        तू मूग गिळून आहेस |
        तू मूग गिळून आहेस | तुला फक्त तीन मिंटं दिली जातील
                                                        बोल
                                                    बोल बोल
                                                बोल बोल बोल

अच्छा
आत्ता आम्ही तुझ्याकडे पाठ फिरवीत आहोत
आत्ता आम्ही कत्तलखोर होत आहोत
घर सोडताना दरवाजेही नेत आहोत
तुझ्यावरून रणगाडे सर्कवित आहोत
थू : तुझ्यावर : झ्यावरतू थू: थू: थू: आभाळ । आम्ही । आभाळ । आम्ही

# उषाकिरणच्या पायथ्याशी ।

उषाकिरणच्या पायथ्याशी महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या
आईबाप नस्लेल्या पोरांसारख्या खडतर : अगर खडीफोड खगोल
त्यांचा सर्वांभूती चढउतार एकीएक दुरकी दोन गिरवण्यात जायबंदी :
: अगर बाळबोध बिगारी
त्यांचा कारोभार साळलेला शेंडाबुडूख : अगर लुतफुतलेलं रायरंदी हाडूक
त्यांचं नाक गळलं थोबड्यावरून : अगर नुस्ती भोकंच स्थाईक
हासडून हासडून
त्यांच्या काखाबगला जळमटल्या चिलाटापिलाटांनी
: अगर त्यांच्या रवंदाळलेल्या इजारीतून ठिबकतं सांडपाणी
त्यांचे हात खोडाबेडा भट्टया शिजविण्यात
: अगर त्यांच्याच बिंदाचिंदांचं रक्त दूषित करण्यात
त्यांचं मनोमन विट विट विटलं नरसाळ्यात
अगर त्यांचं पितळच उघडं उन्हाळ्यात, पावसाळ्यात, हिवाळ्यात
त्यांची शरीरंच किळस किळस किळसलेली एकमेकांजवळ स्त्रीपुरुष
: अगर त्यांची पिंडी निघता निघताच कोसळले मोहरम उरूस
त्वचेवरलं गवत कापून त्यांचा म्हण : अगर त्यांच्यांत मिसळ सरमिसळ
साबण म्हण : अगर त्यांची धुणी कुचल
पाणी म्हण : अगर आडोसा फरशी ब्लेड
हागणदरी म्हण : अगर त्यांची इमानदार म्युनिसिपालिटी
पुस्तक म्हण : अगर त्यांचं कॉलेज ऑफ कॉमन सेन्स
मायाबाप म्हण : अगर खिलाडी भिडो
औषध म्हण : अगर लोकशाही दवाखाना
हे हो : तू हे हो : अगर तू पोखर आंदरबाहर उषाकिरण
उषाकिरणच्या पायथ्याशी महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या
आईबाप नस्लेल्या पोरांसारख्या खडतर : अगर खडीफोड खगोल

## । बेंबीचा देठ ओला होणाऱ्या वयात

बेंबीचा देठ ओला होणाऱ्या वयात
तुझ्या कुकर्माची महाकाव्ये बलात्कार करून
अड्ड्या-अड्ड्यावर जेव्हा तू घोकून घेतलीस
तेव्हा कळले की तू फक्त देवदेवळेच जोपासलीस
दिशादिशांचे दरवाजे ठोठावणाऱ्या
तुझी कीर्ती साता समुद्रापलिकडे नेणाऱ्या बुद्धाची प्रतिमा
तू छिन्नविच्छिन्न केलीस
माणसालाच दास केलेस
पाखंडी मनूला—माणसाच्या शत्रूला
तू डोक्यावर घेतलेस
गीतेचे गरळ प्राशून तू रोम रोम बांडगूळ केलेस
माणसालाच माणसाची हागीमुती काढायला लावलेस
ज्यांच्या रक्तामासावर तुझा पिंड पोसला
त्या महात्म्यांना सडवून तू महाभारत घडविलेस
उद्धारकर्त्याच्या गळ्यात मडकी अडकविलीस
ढुंगणाला बोराटचाची फांदी बांधलीस
संस्कृतीच्या नावाखाली तू त्याला वेशीबाहेर काढलेस
बारा महिने तेरा काळ कढत ठेवलेस, रडत ठेवलेस, सडत ठेवलेस
हे वाद्या ! तू माणसालाच असे हीन केलेस
तुला वेशीबाहेरला आक्रोश ऐकू आला नाही का ?
पेटलेला माणूस दिसला नाही का ?
उदासीनतेचा विराटपणा तुला स्पर्शला नाही का ?
विजेचा लोळ वेशीची तटबंदी फोडून आत येतोय रे
सांग का देत नाहीस त्याला कडकडून मायेचे आलिंगन ?

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८५८७

का तोडून टाकत नाहीस शतकानुशतकाचे काटेरी कुंपण ?
ज्याने तुला आपले सर्वस्व दिले
तुझे ताजमहाल खडे केले
का आठवत नाहीस त्यांना ?
ज्यांच्या हाडमासाचा खच आजही तुझ्या किल्ल्याकिल्ल्याच्या
पायथ्याशी कण्हतो आहे
सांग त्यांच्यासाठी का लिहित नाहीस मैलामैलाच्या
दगडावर एखादी ओळ ?
माझ्या नजरेतून तू पुरेपूर उतरला आहेस
तुझ्याबद्दल आदर वाटत नाही
तुझे गुणगान गावे असे होत नाही
वाटते पान खाऊन तुझ्यावर पचापचा थुंकावे
तुला लेडाच्या गाडग्यात बुडवावे
मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो, तुझ्या संस्कृतीला
शिव्या देतो, तुझ्या पाखंडीपणाला शिव्या देतो
इव्हन मी आईबापांनादेखील शिव्या देतो
बांबलीच्यानो इथं जन्म घेऊन तुम्ही बर्बाद झालात
आता मलाही जन्म देऊन तुम्ही बर्बाद केलेत
मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात जागे झालेत
हजारो वर्षे मी होतो खंगत
या गुहागुहांतल्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे यापुढचा काळ

# । आत्ता

सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला
आत्ता अंधारयात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे
हा आपला बाप अंधार वाहून वाहून अखेर पोक्या झाला
आत्ता त्याच्या पाठीवरला बोजा खाली ठेवलाच पाहिजे
या वैभवनगरीसाठी आपलाच खून सांडला
आणि दगडी खाण्याचा मक्ता मिळाला
आत्ता आभाळमुका घेणाऱ्या हवेल्यांना सुरुंग लावलाच पाहिजे
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षांनंतर लाभला
आत्ता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे

# रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो।

रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
तुमची आयबहीण
आजही विटंबली जाते हाटाहाटातून
मवाल्यासारखे माजलेले
उन्मत्त निरो
आजही मेणबत्तीसारखी जाळतात माण्से चौकाचौकातून
कोरभर भाकरी, पसाभर पाणी यांचा
अट्टाहास केलाच तर फिरवला जातो नांगर
आजही घरादारावरून
चिंदकातले हात सळसळलेच तर
छाटले जातात
आजही नगरानगरातून
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी ?
मरेपर्यंत राह्यचे का असेच युद्धकैदी ?
ती पहा रे ती पहा, मातीची अस्मिता अभाळभर झालीय्
माझ्याही आत्म्याने झिंदाबादची गर्जना केलीय्
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
आता या शहरा शहराला आग लावीत चला !


## । रस्त्याच्या कडेकडेने

रस्त्याच्या कडेकडेने वाढविलेले कचऱ्याचे डोंगर
तसे दुःख आपल्या जीवनात
आपण सर्व किड्यांचे भायबंद असल्यासारखे
छाटीव करवलो गेलेलो
आय्च्या उदरांतून पडलेपासून
'जयराम सिताराम'च्या काठाला लागेपर्यंत
पूर्वपश्चिमचा प्रवास
कुजलेल्या पालांना प्लास्टर लावण्यात व्यस्त
मजल दरमजल करताना
पाठीवर विस्तारत जाणारे जखमांचे नांगरतास
सकाळसंध्याकाळ
उकिरड्यावरल्या अन्नावर
होणारी अर्धनग्न जोगवण–
रवंथ करताना आतड्यात डसणारे कोटीकोटी विंचू
नंतर रात्रीला
प्रायोगिक थिएटरात चाललेले
आपल्या अवस्थांचे तमाम तमाशे
आपण इदीच्या बकऱ्याप्रमाणे बळी जायचे गुपचुप
तरीसुद्धा आत्म्याचे उदात्तीकरण करायचे का ?
जिवाचे नाव लवडा ठेवून जगणाऱ्यांनी
खुशाल जगावे...
मी तसा जगणार नाही

तात्त्विक भूमिकेवर स्वतःला
जगवताना आलेले घनघोर
रितेपण–
चिरंजीव चीर गेलेल्या
भांड्याला सॉडरताना अशक्य व्हावे तसे–
अर्थहीन वाहताना
आपण आपल्यातून उदास
सर्वस्व हरवून–जलमुग्ध
नसांत वाहणारे हे अगडबंब प्रपात
पॅरॅलिसिसप्रमाणे बर्फाच्छादित
आपण दिवसेन्‌दिवस
जड होत चाललेलो–
आपल्या पायाखाली हजारो
प्रामाणिक रस्ते
डोळे विझलेले विझवलेले

## । रांडकी पुनव

रांडकी पुनव साजरी करतात हिजड्यांचे अप्रूप उत्साह
कुठल्याही सोम्यागोम्यानं यावं दार ठोठावून जावं
वीर्याचं भुईनळ पाजळीत आडदांड ८४ आसनं
कुल्ल्यांचे हिशोब चुकते करणारे आयुष्य फडफडतेय
खैरेबांडे पांजरपोळ ।। डग्गा
ह्या सातानवसाच्या चुडेवाढवीस जातीने उपस्थित
ऱ्हायलेला हिजड्यांचा अफलातून बॉस
त्याने आपल्या अस्तित्वाचे टचटचीत कॉरीडॉर्स
पब्लिक केलेत...
तुम्ही तुमची वस्त्रं विसरून जा डोळे विघंळवून पा
स्थिरजंगम जडावलेले ३६ नखरे गिलाव्याचे पालुपद
पुरुषगुढी
टाळ्या पिटून पिटून रोजाना उकळणारे खुजखुजते तांडे
हॅन्ड प्रॅक्टीसचा गंध नसलेले
वर्षातून एकदाच जगतात खुल्लमखुल उरूस
देहावर डकवून बावटे अथवा झिळमिळत्या फिंदारून
आदाकारी जंगली षंढावरून
आर्त आर्त किंकाळत
खरं म्हंजे या धांदलीत चंद्रानं मावळू नये सूर्यानं उगवू नये
ही बीभत्स रात्र सतीसावित्री होऊन नाचतेय टिंगमटोल
कब्री उकलून आलेत सांगाडे
हिजड्यांचे अजनबी अग्निदिव्य पायला
आत्ता हिजडेविरहित जे जे ऑब्जेकटिव्ह प्रेक्षक
त्यांनी आपआपले सामान चाचपून बघावे



धेडघाय पोटले बेवडा टोकून वाजताहेत
क्लासिकल म्यूझिक पेटताहेत गदारोळ गजलांचे
।। आयी दिवाली : आयी दिवाली ।।
तू पतंगासंग नाचे मैं किसके संग नाचू
बता जा :
तुम्ही आपापली पोरं ओळखून न्या
हिजड्यांनी झगे वर केलेयत
हिजडे आभाळ झालेयत

## । वेश्येच्या धंदेवाईक प्रेरणांतून

वेश्येच्या धंदेवाईक प्रेरणांतून सांगाडलेलं जिभांचं जुळं
आतड्यातून फुटून आलंय मणिकांचन
डावे उजवे करत बसलेल्या नेपाळी पोरी जश्या
तुफानात मोडतोड झालेल्या वनस्पती वाजताहेत गोलघुमट
त्यांच्या थिजलेल्या हृदयात हंबरलेला प्लॅस्टिकचा बुद्ध
पावसाळ्यातल्या घरंदाज हिर्वळीत उठून दिसावा इतका सतेज
साहेबी द्राक्षानं गहिवरलेलं आखात
गडबड्या लोळणाऱ्या दळभद्र्या भिकाऱ्यांना सूचिपर्णी गोधडी
मनगटावरल्या चमेलीगजऱ्यात कवळ्या कलेजीची शिकार उरकून
शेवटच्या बसची वाट पाहाणारे बाहेरख्याली लोक
बैलाची शिंगं घुसडताहेत काबुली दाढीत
अटातटीच्या दळणावळणाखाली फिरला जातो सापेक्ष मुद्दा
उखाडलेल्या खडीची सांधेजोड पिळीत
चिघळलेल्या लिक्विड यातनांवर खरचटत रहाते दूरवर
दाभणधार चौउधळ पाठमोहरी
शिंकरतात सहानुभूति भय्येबाज दुधाचे ट्रक्स गुरुशर्टवर
प्रेतवत आंगामांड्यांची बाजारू लपेट फेकली जाते
टेलिव्हिजनवरून आपल्यात
आपण होतो गोगलगाय : शंखशिंपले आणि जास्वंदी गिधाड

## येथला प्रत्येक हंगाम ।

येथला प्रत्येक हंगाम बेदर्दीच असतो
म्हणून फांदीला नुसता सांगाडाच लटकवून भागत नाही रे
इथे पापणीलाच केस नसतो
आणि बुबळांच्या काचा झालेल्या असतात रे
येथला प्रत्येक पिवविता कंजूषच असतो
म्हणून नुसते प्यालेच फोडून चालत नाही रे
इथे आतून पेटलेलाच आत्मा नसतो
आणि सृजनांचे कोळसे झालेले असतात रे
येथला प्रत्येक महाकवी आखूडच असतो
म्हणून शब्दांच्याच नजाकतीला भुलणं शोभत नाही रे
इथे माणसालाच माणूस खात असतो
आणि वाल्याच्या पाठीवरले वळ लपविले जातात रे

## । माचिसाच्या चौथ्या मितीतून

माचिसाच्या चौथ्या मितीतून
आइनस्टाइनचे मळे हलतात डोलतात
आणि रबराची झाडे
गनिमासारखा मृत्यू घेऊन येतात
माण्सातला तोकोनोमा नष्ट झालाय काय
        उजेड
        ध्वनी
        सुगंध
कुठल्याच संज्ञेचा मोड फुटत नाही हृदयातून
हादरल्या जातायत गैश्या देवदास्या
हत्याकांडाचं बीजारोपण होतंय का माझ्यात कुठं
खूरखिळे करताहेत मेंदूची शकलं शकलं
का मला विसर पडलाय त्या क्रूसावरील
        लोंबकाळणाऱ्या पाट्यांचा
● तुम्ही उद्या सुखी व्हावे म्हणून
आज आम्ही आमचे प्राण अर्पण
        करीत आहोत ●
एखादं ग्रेनेड उरावर दाबून मी फुटूतुटू काय
डायनामाइट लावून मी उडवू काय स्वतातला
        दारूगोळा
की
कावळे झुरळे बेडूक उंदिर गव्तीसाप खाऊन
        झोकू साकी
या निर्लेप जंगलात मला कशी आठवत नाही
        त्याने केलेली हाराकिरी

## अनाकार शांततेत ।

अनाकार शांततेत मुडद्यांचा नंगानाच
बरकतीचे काळेतोंड पुन्हा पुन्हा लाजीम
नागकाठी पोचे कुरण कडं दाढीचं मण्याचं
सूत्र मलमूत्र
संध्याकाळी झाली असेल रोपट्यांची सुंता
चुकूनमाकून उरकले असेल किड्यांचे उर्ध्वपतन
नाहीतर कशाला वाया जाईल स्वच्छ पाण्याची दानत
अजमेरचा ख्वाजा फकिराचं डीलबोळ
येताजाता पत्थरांनी ढळलेली नियत
षड्विकार धबधबून धोबीपछाड
पहाडी छक्के सारवतात ईश्वराचं बेंबीमुख
किडामुंगीमाणूसवानरकुत्रंगाईघोडाबैलम्हैस :
हाडांचे हुबेहुब तजरुबे
कुणालाच नावं ठेवायची नाहीत
कुणाच्याही पुढं नाकं खाजवायची नाहीत
दुःखं विसरली जातील आपल्याच हिमतीने

## । दारूळते ग्लासात अंबर

दारूळते ग्लासात अंबर विश्वंभर माझे
सोकव झोकव प्राण
मेहमान
प्रीत न मिले आनबान
धुमधनाना खेळव लोळव वेल्हळव नसनागिणी
रागिणी गटारगंगेची
ओरडव गर्दभ चामडीखालील
सर्पभोर वाहवून ने दुःख डुक्करमुसोंडी
अंडी भिजव शिजव
मगरमच पलित्यात प्रांजल
वर्तमान समीप तुझ्या
ख्रिस्तावरली भिस्त कर स्वस्त लाव शिस्त अश्लिलतेला
ठोकर होकर लेकुरवाळा छळ श्लीलतेचा देवगुणी
हागवणी होतकरू बिचारे कोकरू
चोळामोळा कागजकपटा दिंडोरती पांडुरंग दिंडी
शेंडी
आकारान्त अलगुजते
जुहू बीच घमघमेली
खणक् खणण पावली वाजवली
उजवली लेकबाळ मांड्याभांड्यात
अंकल अंकल लिट्ल स्टार
झंकार
भ्रष्टतेची गीतार सकुमार
गुलजार पैजरा घे वाफारा

भविष्य तुझे तुझ्यासाठी
पोलिस : फोफसे : धुलवड : रैनके दिन हजार
मोजून घे वार
बेजार
।। कर्मकटू ।।

ओ अल्ला मार दे बुच
ओ अल्ला लगादे लूप
खुजळते खूप
तुझे दिपोत्सवी पाप
भोले मलंग उठाले पलंग
चिलीम चिकडी हातपाय पकडी
बनाव गोली : खेल आँखमिचोली
मिरा बन नाचू घासू
चटणी
घाटणी
वाटणी अवलादीवर विसंबून
निमकहराम

छातीमोड अँटे
कुठल्या स्थित्यंतरात व्यालीस तू
फेब्रिक्स कंड
तुझा घो
छू मंतर काली कंतर
पेटीकोटातला अस्थिपंजर
प्रार्थाळतो स्वत:ला सवतासुभा मिळो त्याला मुभा
ग्लास भरभरून ओकतोय सौरभ
रभ


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकीय
अनुक्रम ४९०८७ दि: ८।७४
क्रमांक २१०६ नों दि: ७।८।७२

  रबडी
  स्वप्नातली
  दारूतली
  दारूतल्या
  ग्लासातली
यूयूयू गॉड
  गाडग्यातले बेडूक चिवड
  दवड दिवडी
  १७ पिढ्यांची
  चघळ पघळ माकडहाड
सत्व माझे पायघोळ नशाळू
  कशाला डाळू
सर्वांसाठी सर्वांसमक्ष दारू भरलेले ग्लास

## तडिपार टरफलांच्या।

तडिपार टरफलांच्या रेताड सावल्या
लवंडून आल्यायत खाचांत
स्मशानातल्या धर्मशाळेत कण्हतोय शेवटचा गजर
काळजाचा घड तोडणारा बिबल्या वाघ
जहर उतवतोय आपल्यात
बगलांत शाडू झालेली झुंबरं
रडताहेत जर्द पाऊस
चौमुलखातून आलेत झाकाळून सगेवाले। धंदेवाले ४२०
झाडावरली धूळ झडतेय
चणे भाजताना वाजतात तसे सरण वाजतेय
कवटी ठो झाल्यावर
स्मशानातून कनी कापताना प्रत्येकजण
कपाळाला माती लावतोय
ओठातल्या ओठात ओठग्रस्तून
वादळासारखा बडबडतोय
सूड : सूड :
ह्या साऱ्याच वाटा स्मशानातून जातात काय

## । अल्लाहु अकबर



डोळ्यांवर लगडलेल्या अंधाराच्या चिमण्या उडून जातायत
बेघर पोरांचे पाय कब्रस्तानमध्ये दिसताहेत
आपण गाळू आपल्यातले सिय्या-सुन्नी दर्गे
गुडघे टेकून रडू कब्री कब्रीवर
अल्लाहु अकबर

# क्रूसाच्या कन्वटीला ।

क्रूसाच्या कन्वटीला आपण आपला समागम उरकला
किंवा पखाली भरभरून मुसळधार घाम निथळला
जीव धरून जळणाऱ्या कॅन्डल्स पायावरच विझल्या
हा० हा० म्हंता गावभर झाल्या
आपल्या माथ्यावरच्या काळचाकुट्ट बेवारशी बेटावर
पालथ्या पडलेल्या चंद्रबिंदीचे श्वास नवोदित
वेश्येसारखे जागोजाग दुखावलेले
शेजारी होमगार्डचे रिकामे मैदान दुष्मनदावा साधलेले
कोसच्या कोस चाळवलेलं म्यांव म्यांव रातमांजर
रस्तोरस्ती आपण प्रशान्त प्रदीर्घ रातडांबर

पाऊस कळा
थानांतून मांडचांतून प्राणातून–
ठिकठिकणी चाळण फाळण झालेली छतं नखक्षतं
कोणाच्या अंगवळणातले कैवार मददगार
वळीवात पिंजून पिसून निघालेल्या एकशेएक चलबिचल फासळचा
चाण्यावलाण्यातून खिदळणारी पावसाची की मृत्यूची
सरसर कोसळ भडीमार
ही असुरी पानथळ कोण्या बाळंतणीला
        उखडून टाकणारी
        कोण्या पाटीवाल्याला
        निर्पोट करणारी
        कोण्या महारोग्याला
        झडवणारी
        कोण्या गरिबाचं सत्व घेणारी
        तुकडचास येजीस करणारी
        चूलबंद ठेवणारी
वाऱ्यावर बेसूर झालेले घरसंसार आंतर्यामातून टाहो फोडणारे
त्यांच्यावर झाकळलेली चटयांची कृपा तुटपुंजी
मनाला केवील करणारी
कुठली साडेसाती फुटून पसरलीय आसमंतात

डंख विजा ज्वाळा विंचूकाटयाची झुम्म हलचल
गांडुळं मांडुळं अन्नापाण्यात कडीकोयंडयात
बकालांची खोक्यांची सांगता मुसळधारेत गुमान
पाऊस की अश्रूंच्या धारा
हा अपभ्रंश कोण्या मेंदू हरवल्यांचा
झुंडीच्या झुंडी सरकत्या दफनात कफन बांधून
येरे येरे पावसा
तुला देतो पैसा
जारे जारे पावसा
तुला देतो पैसा
वादळी सामुद्रिकात शरणावत झोपडयांची करवंदी कलेवरं
पावसाला पोळवा पावसाला भाजवा विस्तव आणा विस्तव पाडा
'भोसडीच्यानो तडफडून मराल'
'जा टिपरीत'
चर्र पाऊस पोळवला जातो
अज्ञानाचे दात कुरूकुरू वाजतात
पाऊस कळा
गिधाडं फोडतात मेलेला डोळा
पाऊस पावसाचं थैमान
थानांतून मांडयांतून प्राणातून रक्तातून
माझं ओलंचिक पारंपारिक पिशाच्च
भोवती चार सरमाडं मान झुकवून निर्जल डोळयांची
थानांतून मांडयांतून प्राणातून रक्तातून
पाऊस पावसाच्या ठणकत्या कळा कळांचं झाड पावसात मरणासन्न

## । माण्साने

माण्साने पहिल्याप्रथम स्वतःला
पूर्ण अंशाने उध्वस्त करून घ्यावे
बिनधास डिंगडांग धतींग करावी
चरस गांजा ओढावा
अफीन लालपरि खावी
मुबलक कंट्री प्यावी—ऐपत नसेल तर
स्वस्तातला पाचपैसा पावशेर डाल्डा झोकावा
दिवसरात्र रात्रंदिवस तर्रर रहावे
याला त्याला कुणालाही आयभयणीवरून
गाली द्यावी धरून पिदवावे...
माण्साने जवळ रामपुरी बाळगावा
गुपची फरशी तलवार शिगा हॉकी बांबू
ॲसिडबल्ब इत्यादि इत्यादि हाताशी ठेवावे
मागेपुढे न पाहता कुणाचेही डेडाळे बाहेर काढावे
मर्डर करावा झोपलेल्यांची कत्तल करावी
माण्साला गुलाम बनवावे त्याच्या गांडीवर हंटरचे फटके मारावे
त्याच्या रक्ताळ कुल्ल्यांवर आपल्या घुगऱ्या शिजवून घ्याव्या
शेजाऱ्याला लुटावे पाजाऱ्याला लुटावे बँका फोडाव्यात
शेठसावकारांची आय झवून टाकावी नात्यागोत्याचा
केसाने गळा कापावा जेवणातून विष घालावे मूठ मारावी
माण्साने कुणाच्याही आयभयणीवर केव्हाही कुठेही
चढावे
पोरीबाळींशी सइंद्रिय चाळे करावे म्हातारी म्हणू नये
तरणी म्हणू नये कवळी म्हणू नये सर्वांना पासले पाडावे

व्यासपीठावरून समग्र बलात्कार घडवून आणावे
रांडवाडे वाढवावेत : भाडखाव व्हावे : स्त्रियांची नाकं थानं
कापून मुडद्या गाढवावर बसवून जाहीर धिडवडे करावेत
माण्साने रस्ते उखनावेत ब्रीज उखडावेत
दिव्याचे खांब कलथावेत
पोलिसस्टेशने रेल्वेस्टेशने तोडावीत
बसेस ट्रेन कार गाड्या जाळाव्यात
साहित्यसंघ शाळा कॉलेजं हॉस्पिटलं विमानअड्डे
राजधान्या इमले झोपड्या वखवखलेल्या भुकाळ वस्त्या
यावर हातबॉम्ब हैड्रोजन बॉम्ब टाकावेत
माण्साने प्लेटो आइन्स्टाइन आर्किमिडीस सॉक्रेटीस
मार्क्स अशोक हिटलर बिटलर कामू सार्त्र काफ्का
बोदलेअर रेम्बो इझरा पाउंड हापकिन्स गटे
दोस्तोव्हस्की मायकोव्हस्की मॅक्झीम गॉर्की
एडिसन मेडिसन कालिदास तुकाराम व्यास शेक्स्पीअर
ज्ञानेश्वर वगैरे वगैरेंना त्यांच्या शब्दांसकट गटाराचे
मेनहोल उघडून त्यात सलंग सडत ठेवावे
येसूच्या पैगंबराच्या बुद्धाच्या विष्णूच्या वंशजांना फाशी द्यावे
देवळे चर्च मशिदी शिल्पे म्युझियम्स कुस्करून टाकावे
पंड्यांना बंड्यांना तोफेच्या तोंडी द्यावे त्यांच्या रक्ताने
भिजलेले रुमाल शिलालेखावर कोरून ठेवावेत
माण्साने जगातील सर्व धर्मग्रंथांची ईश्वरग्रंथांची पाने
फाडून हागायचे झाल्यावर त्यांनी बोचे साफ करावेत
कुणाच्याही कुंपणाच्या काट्या काढाव्यात आत हागावे मुतावे गाभडावे

मासिक पाळी व्हावे शेंबूड शिकरावे
घाणेंद्रिये जास्त घाण करतील असे शेवटून घ्यावे
जिकडे तिकडे वरखाली खालीवर मध्ये नरकच नरक
उभारावेत... अश्लील अत्याचारी व्हावे माण्सांचेच
रक्त प्यावे डल्ली सल्लीबोटी खावी चर्बी वितळवून प्यावी
टिकाकारांचे गुडसे ठोकावेत हमनदस्ती पाटचावर
वर्गयुद्धे० जातियुद्धे० पक्षयुद्धे० धर्मयुद्धे० महायुद्धे
घडवून आणावी पूर्ण रानटी हिंस्र आदिम बनावे
बेलाशक अराजक व्हावे
अन्न न पिकविण्याची मोहिम काढावी अन्नावाचून पाण्यावाचून याला त्याला
स्वतःलाही मारावे रोगराई वाढवावी वृक्ष निष्पर्ण करावेत कुठलेही
पाखरू न गाईल याची दक्षता घ्यावी माण्साने विव्हळत किंकाळत
लवकरात लवकर मरण्याचे योजावे
हे सारे सारे विश्वव्यापू गळूप्रमाणे फुगू द्यावे
अनामवेळी फुटू द्यावे रिचू द्यावे
नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये लुटू नये
काळागोरा म्हणू नये तू ब्राह्मण तू क्षत्रिय तू वैश्य तू शूद्र असे हिणवू नये
कुठलाही पक्ष काढू नये घरदार बांधू नये नाती न मानण्याचा
आयभैन न ओळखण्याचा गुन्हा करू नये
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माण्सावरच सूक्त रचावे
माण्साचेच गाणे गावे माण्साने

# जंताच्या माळा गळ्यात घालून।

गुदद्वारात उठलेली फॉस्फरस संध्याकाळ
पिढं घमेलं विस्फारून उतरलोय लेंडवळीत
शेजेआतल्या मातीवर कंट्रीच्या मसाल्याची मलभोर मलय
सरसकटा मीही गणला गेलोय सोनखत
डोळ्यात जळत्या सळया झणझणतात सडेतोड
चरायला निघालेले घुशींचे सोशियल क्लब
अर्ध्या हळकुंडात पिवळे करताहेत लांडगेतोड
कपारीचा घनावर्त साधून चढताहेत एकमेकांवर एकमेकांबाहेर
ढुंगणाकडे सरसावलेल्या हाताची सलगी बाटलेली प्रथमतःच
हात गळून पडला तर किंवा हे ढुंगण
टाकावू चोथ्याची कीव करणारी आई
कुठल्या कचरपट्टीत वाढतेय उत्तरोत्तर
हात तोंड ओठ यावरच इमारती रचल्या जातात
का बीजांड लागण कलमते हापूस। पायरीवर
जठराचे सूक्त गातोय मी
यकृत प्लिहा स्वादुपिंड यांच्यात विभागतोय माझी कविता– माझे अवयव
लहान आतड्यातून मोठ्या आतड्यातून ओसंडतो माझ्या गर्भदरिद्री
नारायणाची कबुतरं
आडपड्यावर उतरवतो चंद्रमौळी यानं
उकिरड्याचा आखाडा भळभळतोय चिद्घन
दोन हाताच्या अंतरावर किडेउचल करणारा कावळा मित्रासारखा वाटतोय
जंताच्या माळा गळ्यात घालून मी रानभरी होतोय

## । मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे

दैववशात् आकारपरिवर्तन घडो न घडो
मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे
ज्याची वहिवाट करता करता दिवस उगवतात
दिवस मोडतात...
अगोदरचे असतील बिचारे भू-दास
नंतरच्या सरंजाम्यांशी हातमिळवणीचे मी टाळले
भौमितिक संसर्गाने वाढली माझी अरण्यगात्रे
भिजले माझ्यातले सांबसाव
मी उंद्राचं प्रच्छन्न धड वर पिरॅमिड
मांस–मच्छर
भात–वैदा
देशी दारू सफेद चाफ्याची फुलं
चुबनं आलिंगनं आसनं दागिनं
पलंग गळणारं घर लोरी रिदम
पिळवला गेलेलो मी : माझ्या तनहाईत
पालवतं जनानी सौन्दर्य
अ = ब साठी लिओनार्डो-द विंचीने रंगवलेली
मोनालिसा
कोसळणारा पाऊस विझणारी सिगारेट निर्जल अंगाची डान्सिग गर्ल
कॉन्ट्रास्टिंग कलरहार्मनी
मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे...

## दरग्याच्या वाटेवर ।

लीक झालेला सूर्य
विझत गेला
रात्रीच्या मिठीत
तेव्हा जन्मलो मी
फूटपाथवर
चिलबटलेल्या चिरगुटांत
आणि झालो अनाथ--
मला जन्म देणारी गेली
आकाशीच्या बाप्पाकडे
फूटपाथी भुतांच्या त्रासाला कंटाळून
लुगडचातला अंधार धुण्यासाठी
आणि फ्यूज उडालेल्या माण्सासारखा
मी वाढत राहिलो
रस्त्याच्या विष्ठेवर
" पाच पैसा दे दो
पाच गाली ले लो " म्हणत
दरग्याच्या वाटेवर

## । आप्लं सायनासंगीत

आप्लं सायनासंगीत मनसुब प्रिंट होताना
ढवळला जातो काकाकुहा
रॉंय रॉंय रहदारीतून पसरतातात घातपाताच्या
    लम्ब्या चौडया अफवा
' यांच्यातल्या नागडेपणाचा विजय असो '
    अस्सं म्हन्न्याचं टाळून
पडिक भिंतीही अवडंबरतात गजगर्दकिराणाभुसार
रोजकीर्दीतल्या लुंग्यासुंग्या प्रश्नाकडं सुद्धा
    कानाडोळा करून चालत नस्तं सदोदित
पुतळ्यांचा थातुरमातुर अथवा स्तंभतोल हवाला देऊन
प्रश्न
पुतळे
यांतून जे जे दुपावतात या जे जे वाढतात पांगारा
गडगंज पुतळे प्लस आपण
अभिसरणाचे लागत नस्तो इनमीन किंवा.एकूण लडिवाळ
ठार आंधळं झालेलं स्मशान उतरतं
वारं गेलेल्या अर्ध्या धडावरून
आणि ब्लॅक लिस्टमधलं आप्लं मन
    चडफडतं कडीकोट

## बाप, वडारी आणि मी...यांची कविता।

वडारी दगडांना स्वप्न देतात
मी फुलबाजा पेटवतो
बापाच्या आयुष्यात
उतरू नये म्हंतात
उतरतो
कानाकोपरा
खाजवतो
वडारी दगडांना फुलं देतात
मी बेंडबाजा वाजवतो
चार स्त्रियांच्या कमानी देहांतून कातळलेला
उभा पारशी ओलांडतो
बापाचा रक्ताळलेला पुट्टा पहातो
अंधाराच्या गोंदणीत
ओठ भाजेपर्यंत
सिगार ओढतो उस्मरतो
वडारी दगडांना गरोदर ठेवतात
मी थकलेले घोडे मोजतो
स्वत:ला टांग्याला जुंपून
बापाचं प्रेत हाताळतो जळतो
वडारी दगडांना रक्तात मिसळतात
मी दगड वाहतो
वडारी दगडांचं घर करतात
मी दगड डोक्यात घालतो

## । फॅमिली रूम्स

फॅमिली रूम्स
विनती बिन्नी जहिदा फ्रिडा लोरा सलमा
मावा केक्स
लिलावलेलं सांवत्सारिक । शारीरिक ग्रहगोल
फटिचर पापण्यात वाढलेली वडसं कोळश्यांचे वृक्ष
खुरपले नाहीत जानव्यांचे पोतराज
        तणांचे बंदिवान तलाव
        हजार शक्यतांच्या झुबक्यात
नरडीला नख देऊन घडविला मुरमाड माळ
करवटून बिछान्यात दुंत्यातित्या हल्लकल्लोळ
        दु:खदायी रात्री
करून घेतले भोसडा उदास
मायाअंगं चिरून घेतली जरतारी
रसातळाला दिले उभे आडवे छेद
शिगोशिग भरली टिपाडं खरकट्याची
गांडू बगिच्यांना दिले दर्यावर्दी आंदण
उखडून बिजागऱ्या सांदीफांदीत पोसवले
जाताही चाम्डीचोर येताही चाम्डीचोर
दिवाल पकडून नाचवले ३६ शीचे मोर

चिखल उफाळून अस्तरवला घुंगुरबाल
छपरांवरलं मांस छिलून सजवले अंगारे धुपारे
शिवले आंगडे टोपडे व्यथांना
नियमितपणे चघळल्या एस० डी० एम०
माथ्यातून अंकुरवली घायपाताची तीक्ष्ण टोकं
सोडले नाडासौंदर आदिअंताच्या मुळाकडे
विनती बिन्नी जहिदा फ्रिडा लोरा सलमा
सहा पाकळ्यांचं छिन्नविछिन्न कमळ
ज्यात सूर्य घुसळला वीषधारी
सरोवराचं काळं जांभळं पाणी
हॅन्डसम मत्स्य तळले पाण्यासकट तीळपापड
जिन्याच्या नक्षीकामातून घरंगळवले आर्टिस्टीक व्हॅल्यूज
हबकून दबकून पायरी पायरीवर
खाजखुयली भिंगरवली शहाळ्या शहाळ्यातून
झावळ्यांचे झाप उंचावून टवाळ्यांना केली मलमपट्टी
चार आण्याचे अलुबुखार बारा आण्याचे घोडेस्वार
विनती बिन्नी जहिदा लोरा फ्रिडा सलमा
दरसालातलं अकळ स्तनागार
दरसालातलं दु:ख रांडाकार
माझ्याजवळ माझ्यासाठी माझ्या समीप आकांडतांडव
मावा केक्स
फॅमिली रूम्स
विनती बिन्नी जहिदा लोरा फ्रिडा सलमा
मी हाकारून आणलेला गौरांग स्वप्नदोष


## । आक्टोपसच्या संघटित जनानखान्याकडे

आक्टोपसच्या संघटित जनानखान्याकडे आपण जात आहोत
मी ६५ मार्चची वृषभचिन्हांकित मुद्रा
माझे ऐवज मोहंजोदारो
मी रेखलंय सिंहस्तंभ शीर्ष
माझे अलंकारिक दिवसमान
पायापासून उत्सर्जित
माझे कॅटोकोम्ब्स हातोहात मोकळे
तुम्ही विखरा आवारात दहीदूधलोणी
आक्टोपसचे संघटित जनानखाने आपल्याकडे येत आहेत
जेवताना माण्सं भेसूर भयावह
अन्नान्नदशा दशमानात अधोरेखित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

१९७० च्या गर्भाशयात
रजस्वला आवा
बिछान्यात हाताच्या कर्तृत्वात पक्षपाती वणवा
आतड्यात भांग
ज्यांनी ज्यांनी गमबूट घातले असतील त्यांनी त्यांनी हात वर करावेत
आक्टोपसचे संघटित जनानखाने आपल्याकडे येत आहेत
गर्भधारणेनंतर मादी नराला खाऊन टाकते
१२३४५६७८९० हे सर्व झाडांचे नंबर्स
एखाद्या दिवसाचा संथपणा आपणास गतीत सामील करावा लागतो
राप धरलेला चेहरा बाजारात बसवावा लागतो
बाजारातून उठवावा लागतो
आपल्यापुढे चार आणि शून्य आहेत
शून्यातून चार संभवतात चाऱ्ही अंगानं पांगतात
चारापुढे शून्य ठेवला तर ४० घडतात
चाराच्या खाली शून्य पसरवला तर
चार शून्याने मजबूत होतात
चार । शून्य यांच्या सहवासातच आपण
।। इन्कीलाब जिंदाबाद ।। म्हंतो
।। रक्ताचा ध्वज ।। रोवतो
चार आणि शून्य चाचपताना ज्यांनी जपली ग्लानी
ते सदोदित राहिले गुलामांचे गुलाम
गर्भधारणेनंतर मादी नराला खाऊन टाकते
तुम्ही विखरा आवारात दहीदूधलोणी
आक्टोपसचे संघटित जनानखाने आपल्याकडे येत आहेत

## । तिच्यासाठी



नरकात तिला ऋतू आला
तिच्या ओटीपोटी लखलखीत बीजपण—
आभाळ मनातल्या मनात
कुढणाऱ्या माणसागत होत गेलं
        फिक्कट पिवळसर
देणंघेणं नसताना
ती रस्त्यातून पैंजणत जाताना
जंतूंच्या समस्त जमातीनं
सहस्त्राक्ष गुढ्या उभारल्या
असोशी वाहणाऱ्या गटारांनी
थम घेऊन–तिच्यासाठी
प्रार्थना भाकली–दुवा मागितला

## वास्तविकाची वाळवी।

वास्तविकाची वाळवी फुलारतं सस्वरूप
सप्तर्षी वडवानल घेऊन खांद्यावर
आम्ही नांदवतो फ्लूट गवताचे
वीर्यदानावर हुकूम जवळीकतो सहजासहजी हमामखाने
व्यभिचार पडताळून
देवाचे काळवंडलेले सद्‌गुणी फॉर्म्स
आम्ही स्वच्छवतो झंझावाती केरसुणीने
चुंबन घेऊन स्वतःतल्या पहिलारूपणाचे
अंगिकारून कचाकडयाच्या भानवशी
हद्दपार मिरवतो बाशिंगातून
उच्छवासासह सामावतो काळचा समुद्राच्या अंतःकरणात
ज्याच्या पोटातले पाणी जोखता जोखता
होतो लांछनाहून हीनदीन
आमच्या भुयारी डोळचातले आदिवासी शिल्पकाम
कुठल्याही माण्साला॰ टांगेवाल्याला॰ दिव्याच्या खांबाला
रस्त्याला॰ इमारतीला॰ वाचता येत नाही 70 M. M. मध्येही
आम्ही कपुरी अंगाने आल्यागेल्याच्या
तळव्याखाली जाऊन होरपळतो
दे माय धरणी ठाय

## । थुई थुई उज्एड

उध्वस्त काळोख थुई थुई उज्एड
थुई थुई उज्एडात तिचे ओलेचिंब पोटुसपण
हा दाब कसला आहे ?
स्वतःतल्या स्वतःत फुटणार तर नाही ना मी
खळ्कन
हे कोण लोटते मला अजगराच्या पोटात
मी खेचला जातोय मुर्दाडासारखा गप्पगार
आतले आत
ती तिऱ्हाइतासारखे पाहातेय
उघड्या डोळ्यांनी
माझे संपत जाणारे मदहोशी अस्तित्व
मी नखशिखांत बधिर...
उध्वस्त उज्एड, थुई थुई काळोख
थुई थुई काळोखात माझे निर्बोंब मरण

## तिने यावे बरसत तिने यावे बरसत ।

विजेचे फूल माळून तिने यावे बरसत
घराघरावर चढलेली बुरशी गल्लीकुचीतून जीवन अस्ताव्यस्त
सारेच सगे सोयरे येता जाता करतात कशा टुचकुल्या
कापल्या करंगळीवर मुतत नाहीत अशा या सांप्रदायिक खेळकावण्या सावल्या
मी कसा एवढा 'पडेल' माझ्या अंत:करणात तिच्या प्रखर तेजाचा धिंगाणा
या भुल्याभटक्यांच्या आंधळया गारुडगोंधळातून माझ्या जोडीला येणार
नाही का एखादा दिवाणा
रोजच 'कोडगा' होऊन मेरीच्या पोरासारखी या जुलुमदारावर करतो
अतोनात प्रिति
'आयऱ्या गैयऱ्याचं झवणं हाय त्याला आसलंगीबी उभं करू नाय' असं
म्हंते माझ्याच रक्ताची वस्ती
यांना ग्यानच कसे नाही ? म्हणून हे घेतात रंगलेल्या तोंडाचे
झिंगलेल्या बाटल्यांचे मुके दिनरात
गाण्यात जीव धरेना असे राजरोस जालिम विष पेरलेले यांच्या शरीरात
तरीही म्हंतो दुव्याने दुवा पेटेपर्यंत काढीत राहिन खसलत
विजेचे फूल माळून मात्र तिने यावे बरसत तिने यावे बरसत

# । तुझ्या निमित्ताने

तुझ्या निमित्ताने
कुसक्या घुशी हाताळतात पारोश्या आठवणी
मेंदूत दुणावतात गांडुळं
बदबदतात कनवळ तडक तवल्या सैरभैर
अकाली विव्हळतात सायरन मृत्यु तळठाव अभिशिप्त
तुझ्यामाझ्यातली वांझ घळयी
विभाजनानंतरही घुसळतेय विषव्याळ
पानाला चुना लावायच्या आत
वायची नांद ठिकवावी
तसा काटचाचा नायटा गुबूगुबू आतबाहेर
मी भयभित : मिटून घेतोय पुंबीज नद्यानाले
बदलत्या पाकळयांचा सरडा उलघाल अजस्र अक्राळ कुंपण
मी वस्फाटलेला मानभावी चकनाचूर
तशात शहर ओसाड मुडदूस
आणि भिंतीला धरून भुळकंडतोय सूर्य
माझ्याच संदर्भात लागू होतोय जंगली लॉ
कोंडीखरजेसारखा वेडाविद्रा विस्तुत विस्तृत

# तिला आणि तिच्या फुलझाडांना ।

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्वागत
अनुक्रम ५९०४१ दि: ९।७४
वर्ग २१०८ नों दि: ८।५।४२

तिला आणि तिच्या फुलझाडांना गळती लागली सांगतात
या भरघोस गर्दीतून पाठीमागे जाता येत नाही
किंवा या गतीतून निखळताही येत नाही
दरवाजेबंद शहरात उतरतो न उतरतो तोच खबर आलीय
तिला आणि तिच्या फुलझाडांना राणीच्या बागेत ठेवल्याची
आपण काय बिचारे कधीमधी फिरकलोच तिकडे तर
दोन दाणे टाकू तिला आणि तिच्या फुलझाडांना कळवळून

## । तळहात विघडून जवळपास

तळहात विघडून जवळपास
तिनं दोन विटाळांतलं अंतर ध्वनित केलंच नाही
वृषणातलं दुःख घेऊन तिच्याकडे गेलो तर ती
रिकाम्या ग्लासासारखी कोरडीठन्न
        लवेचा रंग जात
        काखेतील केसांचा प्रकार
        हृदयपीडा ओटीपोट
        जांघेतील ग्रंथी
        स्वप्नांचा इतिहास
        शरीराची साधारण स्थिती
        अवांतर विशेष
यांचाच चक्रव्यूह मांडून ती विसरली समुद्र
उत्थापनाचे वेळी होणारा त्रास कळ आदि दुःख
ऋतुधर्म सुरू झाल्यावेळचे वय
लैंगिकज्ञान झाल्यावेळचे वय
पहिला संभोग रक्तस्राव
        संभोगोत्तर मनःस्थिती
        आवडनावड गर्भधारणा
        क्रिया प्रतिक्रिया परिणाम
        वय उंची बांधा
यांचेऐवजी हिशोब ठेवला तिनं हाडाचा चामडयाचा
        चिखलीचा
नि तळहात विघडून जवळपास
मी मावळलो कामेच्छा

## अलिकडे तिच्या वाटेत ।

अलिकडे तिच्या वाटेत देशी विदेशी राजहंस असतात
आम्ही आधीचेच झालेलो धुरकट जिथं रंगीबेरंगी
फुग्यांसाठी जीव तोडून रडायचं
अभयारण्य
थोडी पत गाठीला बांधून ऐकायचं तिच्या संबंधातलं
रेडिओबूत जे सकृत्‌दर्शनी शुक्लांगी
जिथं रुततं निवडुंगासह दोन फण्यांतील विषुववृत्त
नि उतरतात कलाबुतीनं गळे पद्मपाणी
जिथं घोड्याच्या घोडवळीला तडफडतात
पाणघोडे पाण्याशिवाय
नि विकारतात पददलित झोळया भोकांडून
जिथं ऑगस्ट सप्टेंबरातला गुलमोहर
त्याच्याकडे पाठ फिरवून तिचं बांधेसूद शरीर
राजहंसाच्या शय्येसोबत
शिशमहल
ज्याचे काटे
आमच्या डोळ्यात माखलेले

## । डॉ० आंबेडकर

धर्माच्या जातीच्या लिंगाच्या वंशाच्या वर्गाच्या चिलखती खुराड्यांना
मूठमाती कल्पिणाऱ्या
झडणाऱ्या बासरीच्या मंद्र पावसात
आत्म्याला रस्ते फोडून विजेरी झाडांना घेरून
ओढल्या गेल्यायत माझ्या दोऱ्या तुझ्या कर्तृत्वाच्या दिशेनं
म्हातारीच्या बुडखात खोल खोल लाथ हाणणाऱ्या
उडून जातोय पारा आरश्यांचा
फाटतोय समुद्र नरकाचा
उंच उंच विखरून नाहीशी होतेय पापग्रस्तांच्या हाडांची भुकटी
मावळतोय सूर्य सैतानांच्या प्रदेशातून
वसंतातून पुराणाची पानं फाडणाऱ्या
माझ्या कंठातून अभद्रलोकांची निर्भत्सना घडविणाऱ्या
तुझ्या स्वर्गीय झऱ्यातून मिळतंय पाणी जन्मोजमीच्या अस्पृश कातडीला
देशाच्या नि माण्साच्या अस्थिरतेला वाव देणाऱ्या
अवदसांच्या नि हाडळींच्या मोहमयी मांड्या पोखरणाऱ्या
देवदत्त वाऱ्याचं गंडस्थळ फोडणाऱ्या
मी जिथून सुरवात करतो त्या तुझ्यापासूनच्या सर्वमान काळाला
बांधणारांनी बांधावे भूतात गोणपटात
नि द्यावीत त्याला मूर्त अमूर्तासारखी भन्नाट नावे
अशा नावाचं संकेत चिन्ह उंच कपाळावर
रेखण्यासाठी असतो सरसावलेला आंधळा समुदाय
स्वतःच्याच महात्मेपणाला सुरुंग योजणाऱ्या
मी शोधणार नाही तुला तेजीमंदीच्या आराशीत घडीच्या घड्याळीत
कावळा ते कारखाना मुतारी ते फरासखाना

गंज ते ७ वर्षाच्या मुलाचं लखलखतं काळीज
या तमाम परिस्थितीतून दोलायमान होणाऱ्या सांगा
मी चोखाळतोय स्थित्यंतराच्या लाटा काळखंडाच्या अग्रावरून
नि विचार करतोय तुझ्या ब्राँझच्या पुतळ्यावर शिटणाऱ्या रानवट
नि शहरी पाखरांचा
तसा विचार हा विचार नस्तोच मुळी तो अस्तो परिक्रमेला गिळत सुटलेला
बांडगूळ
ज्याच्यापासून व्यक्तिमत्वाचा उगम होतो नि खुंटते दीर्घ आत्मयात्रा
ज्यात ज्योत नसते नि धारदार सुरीही
ज्यात सुसरीच्या पाठीसारखी असते स्त्रैणलिंगी कठिणता नि गेंड्यासारखी
उदासिनता
ज्यात नुस्तीच जगण्याच्या मूलस्तोत्राची बडबड नि चिवट घोरपड
नि किल्ल्याबुरुजांसारखी अव्याहत शरीरं
माझ्या छातीत्ली पोकळी हालवणाऱ्या
विचार मरण धादांत दोन्ही
चिलिम संभोग धादांत दोन्ही
जणु संपूर्ण विवस्त्रेला विकत घेतलेलं पांघरूण चिंध्यांच्या देवीपासून
विचार-चिरवेदना जिला सदोदित टोकरतो अस्तित्वाचा पोपट
मरण-शिलालेख ज्याला सदोदित भितो विचारवंत
मरण
विचार
चिलिम
संभोग
१ चक्रवर्तिखडा जो काळालाही दाताने चावता येत नाही
तसं पाहिलं तर मलाच माझा चेहरा पाहता येत नाही ज्याच्याबद्दल
शिसारी वाटावी असा मी त्यांच्या कच्छपी एकुलता प्राणी व्हावा

इतक्या महत्त्वाच्या दारात तू मला लोटले आहेस
कुल्ल्यात उगवलेलं दयार्द्र मातीचं घुबड नि काळ्याशार रक्ताचा गुलाब
ज्याच्या पिकल्या श्वासातून माझ्या ओकारीला आज्ञा घडतात
नि मला गर्दीतून चालवतात
नि चालतात माझ्याबरोबरीने माण्सांसारखी झाडं
नि माझे हात रचतात कल्पांताची बाडं
मला आच्छादन घालणारी मिरवणूक जिला नस्तं मरणमूळ
जिच्यासाठी माझ्या मनात पेटलेला अग्निकुंड नि हवेवर डोलणारे शुभ्र ससे
जी एकाच कुलाची तेजस्वी धारणा ऋतूंनी योजलेली
मिरवणूक नि मी दोन नव्हतोच कधी
समलिंगाची वर्गवारी करत नसतो काळ : कारण त्याचे डोळे नस्तात
सेन्सारइतके अधू
तसे असेल तर माझ्या नि मिरवणुकीच्या तळाशी
जो तुझा चेहरा
देवमाश्यांनी दुखावलाय तो विभिन्न कल्पिलाय काय लोकसभांतून

वेदनेतून यातनेतून दृश्यमान होणाऱ्या
डोक्यावर भक्ष्य शोधीत हिंडतोय लष्करी विमानांचा घोगरा आवाज
नि मार्शललॉची इंगिते
पुसटताहेत नकाशावरून रेषा नि रेषांचे जाळे
नि आणीबाणीतून माझा अट्टाहास निघालय अधिष्ठानासाठी
अश्वमेधी इच्छा घेऊन
सोबत डाळिंबी अरण्यातून तटस्थ समाज : तो उखडला नाहीतर
धोंड येईल तुझ्यात नि माझ्यात नि दिसणार नाही
कमळांनी वेढलेल्या स्फटिकात तुझं तेजोबिंब सर्वजड वस्तूंना नकार देणारं
नि माझ्याशी एकरूप असलेलं भाजलेल्या भाकरीसारखं खरपूस नि कसदार

एखादी मिल एखादी झोपडी
एखादा दमेकरी एखादा सैनिक
दीर्घ वसाहतीमधून दिवस जातात बाळपणीच्या अंगणात
खेळतात तांबूस झिपऱ्या कुत्र्याच्या पिलांबरोबर
आणि हुंगतात कैऱ्यांपूर्वीचा मोहोर
नि पकडून ठार करतात भेडसावणाऱ्या प्रतिसावल्या
हरणासारख्या बागडणाऱ्या खवल्यांसारख्या चमकणाऱ्या कळपाकळपांनी
मला भिती वाटते मी सण्कत चाललोय त्याची
तू गेल्याच्या तब्बल १५ वर्षांनंतर
तुझ्या एका साथीला मृत्यूच्या धुळीनं भरवलं
नि ७१ वर्षांच्या लांबीवर थडगवलं
नि तुझ्या वेळेला पसरलेल्या अवकळेची पुनरावृत्ती झाली
तुझ्या बाबतीत वापरलेल्या हेडलाइन्स
वर्तमानपत्रांनी त्याच्याही बाबतीत वापरल्या
'दलितांचा कैवारी गेला
दलित समाजात खोल दरी निर्माण झाली'
चळवळीतल्या हरेक नेत्याचे अंगरखे सारखे असतात काय ?
नि त्यांच्या संबंधातली शाई नि अक्षरं नि चपला नि पावलं
ज्याच्या हातून कधीच घडत नाही प्रमाद अगोदरच्याची पावलं सोडून
मागं किंवा पुढं जाण्याचा
अशाच्यात नस्ते गतीचं इंधन जे बसवलेलं अस्तं जन्मजात शरीरात
नि धम्मक अगोदरच्याच्या उठलेल्या पावलांइतकी किंवा पावलांहून अलग
जो बांधतो अगोदरच्याच्या उपस्थितीत स्वतःचं कफन
नि गुंततो सनदी सत्रलतींच्या बाहुपाशात आवर्जून
नि बसतो घोडयांवर निपुत्रिक खुर्चीसाठी
जो बदलत नाही रात्र नि दिवसाची चव किंवा जिभ किंवा

जिभेवरली लाळ किंवा लाळेतलं पाणी
जो हरवतो मातीतली जिवंतता नि निर्मितो गटबाजीचे
काळेगोरे राक्षस
अशांसाठी मी डोळे सोडून रडत नाही हृदयानी
नि अंगातलं तेल काढून पेटवत नाही मेणबत्त्या
नि जात नाही काळे कपडे घालून त्यांच्या जाहीर शोकसभेला

लोकांनी दिलेल्या सिंहासनावर विराजमान होणाऱ्या
उद्रेक नि शोकातून मला फक्त तुझाच वास येतो
नि सुटतो माझ्यातील मालवलेल्या बुबळांना नि अपंगांना कंड
तू दिलेल्या संघर्षशील शिकवणुकीतनं मी देतो मूलभूत श्रद्धांना वचनांना
आव्हान
नि खोदतो स्वत:ला दु:खदैन्यातून अंतिम कणापर्यंत
नि मारतो स्वत:च्याही काळजात पाजळलेल्या कुदळी
नि भिजवतो तुझ्या आयुष्याची पानं उष्ण रक्तानी
नि जागवतो माझ्यातली एकमात्र सच्चाई
नि वावरतो बंदुकांच्या फैरींतून तोफांच्या फेकींतून रणगाड्यांच्या धुमश्चक्रीतून
नि गव्हाच्या हिरव्याकंच पात्यांतून
तसा सुईच्या अग्रापासूनच जुळलेला असतो जिव्हाळा प्रेमाशी नि हिरव्या
रंगाशी
नि चपटीतून थयथयणाऱ्या वळूंच्या शक्तीशी
नवऱ्याला पडलेली स्वप्नं बायकोला पडतात बायकोला पडलेली स्वप्नं
पोराला नि बांधली जाते साखळी उद्याच्या सुखरूप परिस्थितीची
तसा प्रत्येकजण असतो पूर्ण सूर्य
जो राखतो निगा निवडुंगासकट सगळ्यांची

नि पाकळ्यांवर सांडलेले दव जो वापरतो
निरंतर पीडेच्या अहितासाठी
ज्याला कळतो जनावर नि माणूस यातला फरक
जो उब्तो दिवसरात्रीच्या त्याच त्याच पणाला
जो मारतो छलांग सर्वांवरून
ज्याला जन्ममृत्यूचा रंग वाटतो मोसंबीचा नि कुचकामी
ज्याची चोच बनते पितळी नि टोचते लूत वर्षावरली
जो वाहतो जयजयकारच्या नद्यांतून बारमाही
नि हलताना दिसतो फुलाच्या स्मितातून
जो नाकारतो रयतेची चाकरी नि येसकरपणाची भाकरी
जो आणतो जनशक्तीच्या किमयेला गाज
जो केकीच्या नी रमच्या चिखलात रुजत नाही
जो पायपुसण्यावर बसत नाही
जो नूतन वर्षाच्या फुलपाखरासारखा उडतो नि प्रकाश पसरवतो
जो रुळांबरोबर वाढत जातो
जो युनिव्हर्सिटयांचे चिरेबंद ढिले करतो
जो स्वतंत्रतेकडून स्वतंत्रतेकडेच जातो
असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी
जो दिग्विजयी तंद्रेतून आमच्यात उतरतो
नि शेतातून गर्दीतून नि मोर्च्यातून नि लढ्यातून
आमच्या बरोबर असतो
नि आम्हाला शोषणातून सोडवतो
तो तू
तोच तू आमचा

## । मंदाकिनी पाटील : मला अभिप्रेत असलेलं कोलाज



भकास निळा कॅन्व्हास
वस्त्रे तडकलेली मांडी फोडलेली वेदनांकित षोडशा
डुक्कर : रक्तानं माखलेलं त्याचं तोंड

दर्शनी आवडणारा चेहरा चेहरा नस्तो खरा तो कडुघोट कवटीचा
बोलीभाषेत त्याला 'सत्य' म्हणून उच्चारतात

माण्सातलं मांस काढून टाकल्यावर
उरलेल्या प्रारूप अस्तित्वाशी कितीसं कुठपर्यंत जमतं
भितीनं किळसेनं उथंबलेलं प्रेमाचं शिवार
आणि सार्वभौमित्व माण्सानंतरच्या चिरायु शून्यत्वाचं
आपली वाटणारी माण्सं नस्तात आपली ती ढीग धुळीचा धुराचा

अलिफसे अनार
बे से बंदर
पे से पंखा
ते से तलवार
टे से टट्टू
से से समर
आराधना माण्साच्या निरनिराळ्या भौगोलिक वळणाची
आणि रोमँटिक गुदमैथुनाची

मंदा
तुझं मन राखेचं नाही न् संगमरवराचं
तुझे केस तुझी वस्त्रं तुझी नखं तुझी स्तनं
मला माझी वाटतात न् माझ्यात साक्षात्कार घडवतात
मृतकॉलन्या० मरू घातलेले कुबडे०
सँडविच० रस्ते० नुकत्याच व्यालेल्या कुतरीचा पान्हा
मला पोचू देत नाहीत तुझ्यापर्यन्त तुझ्या ओठांवर तुझ्या डोळ्यांवर
या समयापर्यन्त नव्हतो आपण एकमेकांचे कुणी
आणि नव्हती संबोधनं आपल्यात बिळं पाडणारी
हा समय १० मैलांइतका लांब, १० सेकंदांइतका जवळ
याच्या अंतऱ्यात
तू : मी : बिया : १ काच चरत सुटलेली आपल्याला

आणि हजार अवस्थांना
पूर्वी कधीच दिसला नव्हता मला एवढा निस्तेज चेहरा
जो तुझा होता आणि तुझ्यासारख्या हजारजणींचा
नाना देशांतून नाना पिंजऱ्यांतून झळकणारा
आणि वेगवेगळी नावे धारण करणारा
आत्ता मला सुकलेल्या झाडाबरोबर त्याची सालही आवडू लागलीय
मी तुझ्या सुक्या निस्तेज चेहऱ्याने दिपून गेलोय
निस्तेजपणातून तू माझ्यात उतरतेस आणि मला आपलासा करतेस
माझ्यात आक्रोश पाझरवतेस आणि मला आक्रोशाचा करतेस
आक्रोश अंत की अंत आक्रोश
आक्रोश अंत खंतेशिवायची घटना
घटनेतले बदल बदलांतल्या वल्गना
काळोखात माण्सं हबकतात काळोखासारखी होतात
काळोखातून चिमण्या येतात कलेवरं फेकून देतात
त्यांचे पंख वाढतात आणि युद्धाला लाजवतात
कल्पनेतून
वास्तवातून
कायद्यातून
धबधब्यातून
झाडातून
सावल्यांतून
तुझ्यातला झोत दिसतो आणि दाण्यांना पिसतो
दु:खाचा उल्लेख होतो आणि दु:ख थडग्याकडे जातं
प्रेयसी : रांडेचं सोज्वळ रूप
प्रियकर : भडव्याचं
बायका पुरुषांच्या छापील रांडा

पुरुष बायकांचे भडवे
स्त्रीपुरुषांचा संबंध
थोड्याशा रांडा थोडेसे भडवे थोडेसे दातवण
जे वापरल्यानंतर थुंकून टाकायचे आणि गंगेत दात खंगाळायचे

मंदा
माझ्या मोरणी
खिडकीतून बाहेर पायलं की नव्या जगाचा जन्म होतो
मिठ्या चाम्डी प्रेम
भोवरा जो खरा नस्तो आणि मोहिनी घालतो
जो गाळ असतो आणि जखमा सारवतो
कुऱ्हाडीने मुंगीचे पाय तोड
ती अंताला धक्का बसेपर्यंत खरडत राहील
आणि मग उरणार नाही मांसाला विष्ठेला केसाला काडीचं महत्त्व
त्यांच्या हालचालींतले वारे गर्भ तोडतात
जे एखाद्याला दिलंस आणि घेतलंस तेव्हढं पुरे नाही का
अंधाराचं झाडआभाळसमुद्रफूलखाट हा तुझा भ्रम आहे
भ्रम फसवतो आणि कबरीकडे नेतो
तुला डांबून ठेवणारी म्हातारी तिला लोक नियती म्हंतात
ती प्राण्याला ताब्यात घेते आणि माती करते
तिला खावून उरणारी माण्सं मृत्युंजय अस्तात आणि जगण्याचे नेतृत्व करतात

आत्ता हॉटेलात मला फर्निचर नाचताना दिस्ताहेत
खुर्च्याटेब्लंग्लासंवेटरगिऱ्हाइकब्रूनमालकअमूल
खोल कोमट स्तब्धतेत
अंग आंखडून बसलेली तू
पहात मांजरीच्या डोळ्यातलं

आणि ग्लासातलं तेजस्वीपण
हिर्व्या लाटांतून हात घालून
खनिजाऐवजी कारुण्य मिळवणारी पृष्ठभागातून
ज्याला खवले पडतात तो पृष्ठभाग अस्तो
खवल्यांकडे पहात नस्तात ज्वाळा
त्यांच्याकडे पाहून राख शिकते नि जगते
नुस्तीच जगण्यात गुंतलेली माण्सं मेलेली अस्तात
आणि थंडावलेली
प्रेम करणारी आणि शरीरासह मनाने गुंतणारी
तुझे डोळे ज्वालेचे आहेत आणि तुझा स्पर्श क्रांतिदायी
तू चंदनाचं लाकूड आणि बाभळीची औषधी साल
तू तलवार आणि मानेतून गळणारं रक्त
तू हाडातून खेळणारी वीज आणि पाणी
तुझी सुकीओली बोटं
चराचराला लाव
आणि बघ किमया तुझ्यातल्या निस्तेजपणाची
बोट लावताच
प्लॅटिनम,
होईल
दगडाचं
आणि विसरून जाशील तू
अकाली झालेली कत्तल

भकास निळा कॅन्व्हास
वस्त्रे तडकलेली मांडी फोडलेली वेदनांकित षोडशा
डुक्कर : रक्ताने भरलेलं त्याचं तोंड

## कु० अनुराधा बुधाजी उपशाम हिच्याबद्दल।

पचेंद्रिये न् तर्क यांच्या साह्यानं तुला सिद्ध करता येतं
की समुद्राला मिळाल्यावर नदीची पृथगात्मता
उरत नाही न् पाण्याचे वेगळेपण
तू योद्धी आहेस न् अस्तित्वाच्या स्थापनेसाठी
अज्ञानाशी झगडतेस
सत्याच्या पराभवानंतर
जेती असूनही तू निःशस्त्र होतेस
वाफसा नसतानाही जमिनीतून चाळवतेस
न् के० एच० आराच्या न्यूडचित्रांसारखी
माझ्यातून स्वाभाविक न् तल्लख वावरतेस
कामवासनेच्या मुक्ततेशी न् शांततेशी
अंतःकरणाच्या समतोलाशी न् निर्वाणाशी
शरीराची फेडाफेड करून : शरीर = इच्छा+भावना+विचार
व्यवहाराला नामरूप देतेस
ज़डलेल्या गंडाचा परिहार करून
साखळदंडातून मला निसर्गाचा बनवतेस
कण्साचं गाण गायला लावतेस
तुझ्याबद्दल मी काय सांगणार
तू दूध भरलेलं दीर्घरूप
१०० मरणं मरूनही न मरणारं
न् लोकांनी बदनाम ठरवलेलं माझ्याचसमोर

आणि ग्लासातलं तेजस्वीपण
हिर्व्या लाटांतून हात घालून
खनिजाऐवजी कारुण्य मिळवणारी पृष्ठभागातून
ज्याला खवले पडतात तो पृष्ठभाग अस्तो
खवल्यांकडे पहात नस्तात ज्वाळा
त्यांच्याकडे पाहून राख शिकते नि जगते
नुस्तीच जगण्यात गुंतलेली माण्सं मेलेली अस्तात
आणि थंडावलेली
प्रेम करणारी आणि शरीरासह मनाने गुंतणारी
तुझे डोळे ज्वालेचे आहेत आणि तुझा स्पर्श क्रांतिदायी
तू चंदनाचं लाकूड आणि बाभळीची औषधी साल
तू तलवार आणि मानेतून गळणारं रक्त
तू हाडातून खेळणारी वीज आणि पाणी
तुझी सुकीओली बोटं
चराचराला लाव
आणि बघ किमया तुझ्यातल्या निस्तेजपणाची
बोट लावताच
प्लॅटिनम,
होईल
दगडाचं
आणि विसरून जाशील तू
अकाली झालेली कत्तल

भकास निळा कॅन्व्हास
वस्त्रे तडकलेली मांडी फोडलेली वेदनांकित षोडशा
डुक्कर : रक्ताने भरलेलं त्याचं तोंड

## कु० अनुराधा बुधाजी उपशाम हिच्याबद्दल।

पचेंद्रिये न् तर्क यांच्या साह्यानं तुला सिद्ध करता येतं
की समुद्राला मिळाल्यावर नदीची पृथगात्मता
उरत नाही न् पाण्याचे वेगळेपण
तू योद्धी आहेस न् अस्तित्वाच्या स्थापनेसाठी
अज्ञानाशी झगडतेस
सत्याच्या पराभवानंतर
जेती असूनही तू निःशस्त्र होतेस
वाफसा नसतानाही जमिनीतून चाळवतेस
न् के० एच० आराच्या न्यूडचित्रांसारखी
माझ्यातून स्वाभाविक न् तल्लख वावरतेस
कामवासनेच्या मुक्ततेशी न् शांततेशी
अंतःकरणाच्या समतोलाशी न् निर्वाणाशी
शरीराची फेडाफेड करून : शरीर = इच्छा+भावना+विचार
व्यवहाराला नामरूप देतेस
ज़डलेल्या गंडाचा परिहार करून
साखळदंडातून मला निसर्गाचा बनवतेस
कण्साचं गाण गायला लावतेस
तुझ्याबद्दल मी काय सांगणार
तू दूध भरलेलं दीर्घरूप
१०० मरणं मरूनही न मरणारं
न् लोकांनी बदनाम ठरवलेलं माझ्याचसमोर

## । पाणी

पाण्याला नैराश्य आणल्यानंतर
हातघाईवर येतो जीवनमरणाचा प्रश्न
आणि मग नाही उरत लोकधून
'आम्चा एडका उडचा मारितो मागं सरुनि धडका घेतो
हय लाव्हरी चिन' म्हणण्याची
नजरेसमोरलं झाड खाऊ लागत
आपलीच फळं जिभल्या चाटीत अनायासे
इच्छा असेल तर रोग येतो शरीराकडे
घडतो टोक निमित्तमात्र
पादाने हालतो पिंपळ
चवताळतो साळसूदपणे पोटातला चैतन्याचा किडामकोडा
मग कसा दुर्लक्षिला जाईल
पाण्याच्या भिंगरीबरोबरच होणारा जन्म एकेका कुरूपाचा
मख्मली पाटातून
होते मोट एरंडाची
बांधली जाते मोळी चालत्याबोलत्या पाण्याची
लागतं कुडाला डोकं नी आड्याला पाय
घोंगावतात चिलटं धावं दणाणून
उतून निघतात शेराच्या डिऱ्या क्षितिजावर
तुटू लागतो उंबरातला सुलक्षणी जीव
शेंगा चाळताचाळता झडतात बोटं तहानेची
आणि नुस्त्याच वसाड शरीराची करुणा मागतो माणूस
वास्तं वाडगं जमिनीच्या तोंडाचं
कित्ती सुंदर गोंडा घोळतात तुमच्या धर्मातीत राजवटी

वर्ल्या आंगाला तुमी पाणी भरायचं
खाल्ल्या आंगाला आमी
वाहव्वा वाहव्वा कसा सोवळ्यानं शिकवला जातोय पाण्यालाही चातुर्वर्ण्य
१८८१ च्या कायदेकानुनीत भिजत पडलेलं तुमचं हुजरी घोंगडं
वांझोट्या स्निग्धतेने आम्हाला खेळवणारी तुमच्या भुत्याची सोंड
पाण्यात हागलेलं लोपत नस्तं बरं का
आणि बेमिसाल हत्या घडवलेलं
आंधळ्याचा हात फोद्यावर पडताच उंडारणारी
चवचाल गिधाडं पुष्कळ असतील तुम्हाला लागू
पण उरणारे जे सस्तन आहेत ते तुमच्या गोधडीला
ह्याच्यावर मारतात
नि निर्मळ रात्री अबाधित ठेवतात
त्यांना कुठल्याही भांड्यात ठेवलं तरी कळकत नाहीत
त्यांना कितीही झिजवलं तरीही कल्हईची जरुरी पडत नाही
ते तुम्ही पसरवलेल्या दयावादी कालव्यांना भुलत नाहीत
रब्बीच्या खरीपाच्या चवथरीला भेत नाहीत
लावतात तुमच्या सडेलपणाला तुंबड्या
उठवतात तुफानी चगदा तुमच्या शरमेसाठी
आपली अल्पसंख्यांक आयाळी विसरू पहातात समेवर येऊन
तिथे तुम्ही किती बहिष्कारून टाकणार आहात गावेच्यागावे
नासक्या नाकाने
पाण्याचं अंत:करण अस्तं मूलगामी नि उदार
त्याचं पिस फिरलं तर क्षणात खपल्या पडतात हजारो दुःखाच्या
किती करणार तटबंदी पाण्याला
कशी घालणार वेसण पाण्याच्या खळाळत्या रुपाला
पाण्याची कधीच संपत नस्तात स्टेशनं

पाण्याला बडवावं लागत नाही ठणठणपाळ
गाढवं रडवण्याइतकी वग येत नाही पाण्याला
पाण्याचे दरवाजे अस्तात अल्लख ब्रम्हचाला मिथ्या ठरवून
पाणी पाप-पुण्याच्या पुढं धावतं
जे जे पाण्याच्या वाटेस जातात ते ते तिसऱ्या पायातून पाताळात पोहचतात
भल्याभल्यांनी करू नये छक्केपंजे पाण्याशी
पेरूमल कमिशनातल्या १११७ कत्तलींची अस्मिता अस्ते पाण्याला
किलावेनमानीतल्या होळीची धग अस्ते पाण्याला
चुरगळून टाकलेल्या हजारो चोळयांची रग अस्ते पाण्याला
तुम्ही पाण्याच्या नादी लागू नका
त्याची जातकुळी शोधू नका
पाणी अस्तं सिद्धार्थासारखं
पाणी अस्तं अशोकवृक्षासारखं
पाणी अस्तं तेजाबही

" पाणी पाणी
पाणी बोल तेरा रंग कैसा
बेटा तेरी आंखो जैसा
पाणी पाणी
पाणी बोल तेरा रंग कैसा
बेटी तेरी प्यास जैसा "

तुम्ही तुमच्या बहुसंख्यांक बलाच्या झुली काटयाबंधाटयावर वाळत टाका
नि पाण्याला रस्ता करून द्या
वाढ गे बाये पाणी वाढ गे
वायशी धार सोड माये
सोकन पडलीय घशाला
आवं दादा आवं पाटील

आवं धनी आवं द्येवा
आग आग आ ऽऽ
हात् तुह्या बांबू हासाडला
ह्रे चिपाटचाटच्या
मह बुडाख तुह्या तोंडावं हानी
हाट हाट ये बेटीचोदा
ये घालमुठ्या हे माठ्या
ये उटनखाटाच्या आवलादी
हट हट ये पाण्याच्या अडसरा
'तू यहाँसे निकल जा मेरा खून मत जला
मैं तुझे फाड डालूंगा दुनियाको जला डालूंगा
हट हट'

नदी राखते जन्मसिद्ध हक्क माण्सावरला
आम्ही जिथं जिथं पाय टाकू तिथं तिथं फुटतील उपाळ निवाळचंग पाण्याचं
आणि मग आमच्यासकट कुणीच रहाणार नाही तहानेला
आणि भाजणार नाही हीर पाण्याचा
पाण्याला जातीय रंग देणारा तुमचा
एकुलता एक ईश्वर त्याला लागेल आफलातून बुळगा
नि मग तुम्ही धोतराचे सोगे ओले ठेवण्यासाठी
मागाल भिक पाण्याची
आम्ही तुम्हाला पाण्याने भरलेले रांजण देवू
हे छळकऱ्यांनो
पाण्यासारखं सुंदरकर्तव्य दुसरं कुठलंच नस्तं जगात
पाणीटंचाई आली तर
तुम्ही शर्टासारखी शहरं बदलता
मग सांगा पाण्यावाचून तडफडून मरणारांनी
काय बदलावं

## । कॉम्रेड अर्थात १२ बलुतेदारांसाठी

कॉम्रेड
ही लोकशाही नाहीहे
ही विटंबना सतरा पिढ्यांची मूग गिळून पोसलेली
हा प्रकाश नाहीहे
हा पिंजर पिळवणुकीचा
आतडी सुजलीयत ना सुजू देत सडू देत झडू देत
लोकशाहीत सात्विकतेने जन्म दिला जातो त्यांना
पायाखाल्ली भूमी चोरून
पसरवल्यायत पपयीच्या बिया या नाझी लावण्यवतीने
आपल्या पृष्ठाखाली
ज्याच्यावरून रेंगाळते लाळसूत्री आंधळेपण
बायाबापड्यांचे खनिजाच्या इच्छेने
उडणारा बगळा सुंदर दिस्तो तशी विस्तारणारी लोकशाही
दगडहेत हे
दगडांवर प्रक्रिया करणार ?
गवतहे हे
गवत डोळ्याला लावणार
व्हिनसच्या मलिद्यातून आकारणारा गिलोटीनचा सालंकृत राक्षस
कोसळताहेत झाडे तुटताहेत माना
बुडाच्या दिशेनं वितळत चाल्लीय मेणबत्ती
व्हिनसच्या बोटाला चिकटलेलं पोर पाखरू शिटतंय त्याच्यावर
कसले हे विकेंद्रीकरण
काय–सामान्य माणसाला सत्तासंपत्तिप्रतिष्ठा दिली जाईल
नाही नाही कॉम्रेड, हा खेळ कठपुतळ्यांचा

ही भानामती बुडबुड्यांची
जिथे मेलेल्या कुत्र्याच्या नावाने हजार एकर जमीन जडविली जाते
जिथे डुकरात व माण्सात कदान्नासाठी स्पर्धा लावली जाते
त्या सोद्यांच्या हयातीत हे कसे शक्य आहे
झाट् तोडून मढं हलकं होत नाही कॉम्रेड
इथे मला तुम्हाला राबवली जाणारी आरचना हवीय
आत्ता सहन होत नाही वर्षन्वर्ष सर्वा वेचण्यात आयुष्य गुंतवणं
रस्ते बदलून देखील धसकाटेच लागतात पायाला
तरवडाच्या पिळयावर तगवलेल्या पेशी की पिसवा
नको वाटताहेत ह्या जाणिवा
त्यांची सिफ्तारं
नि नित्याच्या जीवनक्रमास चिकटलेल्या गोचड्या
हाड म्हंताच कुतरं हाडूक टाकून दोन कोस पळतं
आणि माणूस...त्याच्या अमर्याद लाचारीच्या कथा
कंच्या सत्यजित रेला अभिप्रेत
ह्या बोटाची थुंकी त्या बोटावर नेणारी करपावली
संबळगती
बाजीरावाच्या नावानं तानाजीलेकानं उद्धार मांडिला
दादा उद्धार मांडिला
धर्म जी केला
सूर सनई हलगी
तुणतुणं पाचवीला पुजलेलं
ववसा भगुलं तव्याची पाठ
आंबील ठोंबऱ्या शेंगुळ्या रेवड्या
अस्तो फटा साऱ्याच गोष्टींना
हे छळणारे शहरी न् गावगाड्यातले घुगरझोडे


कशी आंधळी झालीय खुळखुळ्याची काठी
अन् तिची सागवानी अस्मिता
कसदार मातीला कसर की करडई फुटलीय
' जव्हा डफड्यावर टिप्रू पडलं
तव्हा प्वॉराचं ग्यानच पार ग्यालं '
म्या नगरात वाजिवलंय म्या जुंद्रात वाजिवलंय
म्या भिंगरात वाजिवलंय म्या क्याँद्रात वाजिवलंय
पोलादालाही रोमांच उठवणारी
कुठयत ती पवळीची घुंगरं
आणि हलगीतुऱ्याच्या जितराबाला पाचर ठोकणारा
कुठय तो हरीबा वडगावकर
शिदळकीच्या सात घोड्यांना चाप लावणारी
कुठायत ती राठरसरशीत निब्बार घट्ट बोटं
कशी पडली फुट--कुणी पिळलीय खुंटी
शंभर फुलं फुल्लीच पाहिजेत ना
पण ती गोऱ्या रंगाची नकोयत
अंगावर व्रण बाठाळताहेत दिसामासा
आप्ल्याला काळ्या रंगाची फुलं हवीयत
जी आप्ल्या नि प्राणिमात्राच्या उमेदवारीस लायक

चाल्लेय मतलयी बोटांनी कैची
चांबउवानी गदाळलेला करगुटा तुटतोय बॅम्बटापासून
मांजार आडवं गेलं तरी थांबणार नाहीयत अत्ता ह्या भिंती
आणि हाडापेरांतून उचल खाणारी ही सर्वज्ञ चित्रं
पहिलं आंबेडकराचं म्हंजे माझ्या लढावू पेशीचं
दुसरं मार्क्सचं म्हंजे माझ्या मूलभूत प्रगल्भ आत्म्याचं

तिसरं माओचं म्हंजे माझ्या सर्वयुक्त त्वचेचं
रंग नाही धारणा
नग्नता नाही क्रियाशीलता
आपण सर्व नव्या अस्तित्वाचे चितारी लढारी
हा आप्ल्या उमेदीचा लाँगमार्च
पालिची अंडी उबवू देत साम्राजवाद्यांना
मुतणाऱ्या पालीचा शुभशकून आपल्या आरमारी अंगांना
उकरू द्या उकरू द्या उदांना मढं कालचं
सनय वाजवितो याच्या सनईला चांद
आत्ता माझं बाळ कोण्या माउलीचं ग्यांद
सनय वाजवितो हात काय बाण्या बोल
आत्ता माझं बाळ गव्हळ्या नाग डलं
डोंगरदऱ्यातून गायली जाणारी संतत अंगाई
आई आईच म्हणावे आई कुणीच होईना
आईची सर शेजीला येईना
चला चला कॉम्रेड
पाठीवर धाव टाकून
रंगू डुल्लत डुल्लत जाय पांडचा त्वांड वासून पाय
लोकशाही डुल्लत डुल्लत जाय आपुण त्वांड वासून पाय
आली तशी गेली
प्वॉट फुगून मेली
भंडार भोग्या रं भोग्या म्हणू द्यावा
तुज्या भंडारं भंडाराचं लेणं
तिथं द्येव नांदतो नांदतो मल्हारी
येळकोट येळकोट बोलती व नीत काय ढुंगाण हालविती
हाब ऽऽ हाब ऽऽ हाब ऽऽ

देमाय देमाय सोड अढी उभार गुढी
उज्वीदेग उज्वीदेग देग तुजी लेकरं तुज्या पटकुरांवर बसलीत
तुला सोन्यानं मढतील तुला चांदीनं घडतील
तुज्या झाडवानाला सजवतील
सुकाळ करतील द्वाही फिरवतील
देमाय देमाय उज्वी...
बोल बोल मोठचां बयांकी जेय ये शिवच्या आई
ये बापदेवा ये जाणाय ये जोखाय ये महाराय ये मांगाय
ये खरूजाय ये गजकर्णाय ये ये
ये काळचा मातीच्या भुता
ये पंचकल्याणाच्या ढचाकळा
ये ये
तुज भलं व्हयील भलं व्हयील
तुज्या राज्यात पानी पडल पडल
त्वोड त्वोड लंगर
सदानंदाचा येळकुडबे येळकुडबे
बहिरीनाथाचा चांगभले चांगभले
वाजव वाजव कोरडा व्हय वला
        मैतर भला
जागरणाला यावे द्यावा जागरणाला यावे
जागरणाला यावे माई जागरणाला यावे
जागरणाला यावे बाबा जागरणाला यावे
जागरणाला यावे दादा जागरणाला यावे
जागरणाला यावे मंडळी जागरणाला यावे

ही लोकशाही नाहीहे ही विटंबना सतरा पिढचांची
म्हणा म्हणा कॉम्रेड दंड ठोकून म्हणा



‘ हाण सख्या तुझीच बारी
लोकशाही मेली तर डेंगण्या मारी ’
द्या द्या दंवडी कॉम्रेड
ही लोकशाही नाहीहे
ही विटंबना सतरा पिढ्यांची
मूग गिळून पोसलेली

## । निमित्त १५ ऑगस्ट ७१

१ :

पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे
रामराज्याच्या कितव्या घरात आपण ऱ्हातोत
उद्गम विकास उंची संस्कार संस्कृति
कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा
कुठल्या औट घटकेत स्वातंत्र्यानं केली पारायणं माँटेसरीची
स्वप्नातल्या स्वप्नात चोरीला गेलीयत पाने फुले
कुठल्या महद्स्थित्यंतरानंतर कामधेनु व्यालीय
सटरफटर दु:चिन्ह
९ महिने ९ दिवस कुठल्या षंढांच्या बैलाला झालाय रेडा
कुठलं शिंगरू मेलंय येरझाऱ्यानं
का नुस्त्याच केसावरून हितसंबंधात बांधल्यायत चिनीभिंती
अन्न
पाणी
वस्त्र
निवारा
आज मला २४ वं वर्ष लागलंय
*या आपण मिळून आईचं गौरवगान गावू*
*कारण जेव्हा सर्व राण्या सम्राज्ञा मरमिटून जातील*
*तेव्हा एका महाराणी शेष असेल ती आई !*
*तिच्याजवळ असेल तिची सन्तान*
*फाटक्या कपाळावर अभिवादनाचा हात ठेवून*
*' माँ आता आम्ही डायझोन घेतोत '*

कारण आई आपल्याच लेकरांची शोषिता नस्ते तर...
आम्चा काय काय ड्यू तुझ्यापास्नं
तुझ्या वावरात पिक निघालं मटकारायटरांचं
नि शिकले आबालवृद्ध एफेल वापरायचं
तू सजवलेस ज्यूडास वृक्ष
ज्यांच्या पायथ्याशी अगणित प्रेतांचा खच
मी पाहिले नाहीत महायुद्धांचे दुष्परिणाम आणि नंतर
पसरलेले संसर्गजन्य रोग
मला माहित नाही स्त्रियांच्या गर्भांत फुटलेला हिरोशिमा
किंवा हिटलर मुसोलिनीनं घुसवलेल्या माण्सांच्या छातीत
खिळयांच्या टाचा
मी कसे १५-८-४७ ला पायलं होतं एका बाजूला
स्वच्छ निळसर आकाश
घोटा घेवून झिंगलेले माडताड
गुलालाच्या अबिराच्या राशी
नाच घोडे लेझीम ढोल
आईच्या पिशवीतली समृद्धी

२ :

स्वा
तं
त्र्य —
३ अक्षरांची उठबस लोकल रजिस्टरात
जिथं उसळपावाची दैनंदिनी आम्ही रोज खरडतो
नाहीतर गुरुजी वर्गातून हाकलून देतील
बापाची चिठ्ठी आणायला सांगतील

किंवा आईला बोलावतील
किंवा किंवा किंवा कावकावकाव
*विजयी विश्व तिरंगा प्यारा झंडा उंचा रहे हमारा*
*चाहे जान भलेही जाये शान न उसकी जाने पाये*
कुठल्या हुकाला माझं शरीर लोंबतय
कितनी खनी कितना बावडा
मेहताजी शामको घर आना
अबे तेरे माके मुलुखमे लंड मारू

**सत्यमेव जयते**

*तर या स्तंभशीर्षावर चारी दिशांना तोंडे असलेले चार सिंह आहेत खालच्या वर्तुळाकार पट्टीवर प्रत्येक सिंहाखाली धर्मचक्र कोरलेले असून मधल्या जागेत हत्ती अश्व वृषभ सिंह यांची धावती चित्रे आहेत या पट्टीच्या खाली उलटया कमळाची रचना कोरलेली आहे हे उलटे कमळ व त्यावरील वर्तुळाकार पट्टी प्राचीन इराणी स्थापत्य शिल्पावरून घेतलेली असावी सिंहाच्या आकृती व घडण ही परकीय शैलीचा प्रभाव दर्शविते एकूण शिल्पवैभव आणि उदात्तता यांचे निदर्शक आहे कल्पना आणि कारागिरी आणि विशेषतः घासून त्याला आणलेला काचेसारखा गुळगुळीतपणा यामुळे हे शिल्प अप्रतिम झाले आहे स्वातंत्र भारताने या स्वातंत्र्यशीर्षाचा राजमुद्रा म्हणून अंगिकार केला आहे त्यावरील चक्रही मध्यवर्ती चिन्ह म्हणून स्वीकृत करण्यात आले आहे*

ठण ण ण ण ण ण ण ठण **ठण ठण**
शनवारी स्केचबुकं घेऊन या
नायतर धोंडी केली जाईल
मास्तर मास्तर बिनखवडा
पोरं पळाली घर लवडा

३ :

तांबडा+तांबड्या रंगाच्या भिन्न छटा = एक रंगसंगती

<table>
<tr><td>तांबडा+तांबडा—तांबडा+जांभळा</td><td></td></tr>
<tr><td>तांबडा+तांबडा—नारंगी+तांबडाजांभळा<br>तांबडा + हिरवा—</td><td>} सजातीय<br>रंगसंगती</td></tr>
<tr><td>तांबडा+सफेद+ ?</td><td>त्रिरंगसंगती</td></tr>
</table>

देवाला सगळे सारखे आहेत
तू बराए वस्ल कर्दन आमदी
न बराए वस्ल कर्दन आमदी
अवर्षण पूर भूकंप

४ :

आर्थिक सामाजिक नैतिक सांस्कृतिक : विटाळ माझ्या आईचा
मला मधुमेह झालाय
माझ्या शिश्नातून साखर जातेय
माझ्या सिफिलिससाठी डॉक्टर मागवा
फॉरीनरिटर्न
संस्कृतीचा उत्कर्ष ऱ्हास मी येथलं काय काय वाचलय
मारुतीनं आपली शेपटी वाढवली नंतर शेपटीला धरून
वानरं पलिकडल्या टोकाला गेली समुद्र पार केला
मारुतीची शेपटी भीमाला उचलंना थू:
मी येथं का जगतोय कशासाठी जगतोय
मी येथं फुकट गेलोय—छी:

*जे जे म्हणून मानवी त्यातले काहीही मला परावे नाही—तर हे मार्क्स-वाद्यांना अमानवी समजून नाकं मुरडणाऱ्यांना आधी सांगितलं पाहिजे अन् त्या जोडीनं स्वतःला मार्क्सवादी म्हणविणाऱ्यांनांही जेव्हा अंदाजअडाखे*

*कल्पना संपतात तेव्हा प्रत्यक्ष जीवनात खरेखुरे वस्तुनिष्ठ सप्रमाण शास्त्र सुरू होते दारुगोळा व तोफाबंदुकांच्या शेजारीच ॲचिलस बसू शकतो का ? छापखान्याच्या वाफेच्या यंत्राच्या जमान्यात इलियड निर्माण होऊ शकते का ? म्हणूनच महाकाव्यानीर्मितीला आवश्यक असलेली भूमी नष्ट होत नाही का ?*

बंगलादेशमध्ये अमानुष हत्याकांड चालले आहे
प्रेतं नदीतून वहात जातात नदीचं पाणी लालीलाल लालीलाल
काठाला लागलेल्या प्रेतांवर
कावळे बसतात गिधाडे बसतात
आतडी काढतात खातात
डोळे काढतात खातात
नाक काढतात खातात
कान काढतात खातात
इंद्रिय काढतात खातात

*बुद्ध आला त्याच्या हातात एक प्रेत होतं त्यानं प्रेताच्या पाठीवरून हात फिरवला स्मित केले एकही शब्द उच्चारला नाही आम्हाला त्याचा अर्थ कळला आणि आम्ही*

उत्तर+दक्षिण+पूर्व+पश्चिम
कुणीकडेच गेलो नाही
फक्त निराश झालो
स्वातंत्र्यात माणूस निराश व्हतो
कोई सागर दिलको बहलाता नही

५ :

पाद्री व्हाइटफिल्डसारखे आपुन किती वेळा स्वच्छ व्हतो
आंघुळ करतो

माझ्या खिडकीच्या काचेवर मी लिहितो
मला गुन्हे अबोध असोत
मला गुन्हे अबोध असोत
लेडी मॅक्बेथ तुझ्या हातावर
साकळलेलं रक्त धुवायला
माझ्या पिपात पाणी नाही
कारण आम्च्या स्वतंत्र देशात
१ तांब्याला १० पैसे पडतात
गोळाबेरजीत वात्स्यायनाची स्वरूपं दिसतात
मजूर हमाल सिनेमास्कोपात ८४ ब्लू शिखा पहातात
उदासवस्त्या जात्याखाली भरडल्या जातात
आणि सायलन्सझोनमध्ये मी संतासारखा निर्विकार
स्वातंत्र्य आलंच नाहीतर आम्ही सुराज्याचं
झाड हालवतो
प्राणाच्या स्वातंत्र्यासाठी जीभ छाटली जाते
ते कॅलेंडरवरलं जंतुजन्य खिडार स्वातंत्र्य
वाहने डाव्या बाजूने हाकावीत
डाव्या बाजूने चालावे हिर्वा सिग्नल पडला तर जायचे
लाल सिग्नल पडला तर थांबायचे
गांधीसारखा सत्पुरुष हाताळायला मिळ्ळा तर
माझंही मुकंबहिरं आंधळं माकड होईल
आज २४ वर्षानंतर माझा चेहरा पुन्हा उजळतोय : पाघळून मेण
बाजूला होतंय
माझा बाप माझ्याबद्दल निराशहे
माझा समाज माझ्याबद्दल निराशहे
प्रत्येक फुगा टाचणी लागल्याबरोबर फुटतोय

स्वातंत्र्या— तू न्हायला नकोस काळ्या खडकाआड
तू झोपायला नकोस स्वच्छ इस्तरीच्या गालीच्यावर
तुझ्या पिलावळीत नकोत चिरडायला आम्चं पुंबीज
तुझ्या सस्यश्यामला कुशीत नकोत उगावायला पोल्सनी घागरी
तू सर्वांच्या डाळरोटीवर पसर गूळखोबरं
मी तुझ्यासोबत फायपीस बेलबॉटम
विकासून हाडकी हाडवळा पुन्हा हाक मारतोय तुला
तू ये आणि हा उरातला गहिवर
ज्याच्या चांदण्या तुझ्या मार्गात पसरलेल्या
तू ये झोळणा घेऊन ज्यात पान
सुपारी
कात
चुना
लवंगा अस्तर

दा. क. ........
शाखा (स्थळ प्रत)
ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.